# ईस्पर्श

**वर्ष पहिले. अंक पहिला**



ई साहित्य प्रतिष्ठान

# ईत्यर्थ

वर्ष पहिले. अंक पहिला.

जून २०१२

संपादक मंडळ:

**नाम गुम जायेगा : ठाणे**

**तनवीर सिद्दिकी : छत्तीसगढ**

**सृजा : औरंगाबाद**

©सर्व लेखनाचे हक्क संबंधित लेखकांच्या स्वाधीन.

सर्व चित्रे गुगल वरून घेतलेली आहेत. त्यांचे हक्क त्या त्या चित्रकाराच्या अधीन

©ई साहित्य प्रतिष्ठान® 2012

ईत्यर्थ हे मुक्तपीठ आहे. लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची मते आहेत. त्यांच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

संपर्क: E Sahity Pratishthan
Eleventh Floor (G1102)
Eternity
Estern Express Highway
Thane. 400604.

वेबसाईट: http://www.esahity.com/

ईमेल: esahity@gmail.com

मोबाईल: 9869674820

# संपादकीय

सजल घनांची लेणी लेवून
ज्येष्ठ अवतरे आभाळातून
तरारती काळ्या मातीतून
हिरवे तुरे सहस्त्र
ईत्यर्थ

मांदियाळी प्रतिभांची जमली
लेख कथांची भट्टी सजली
शब्दांची नित नवी नवेली
पूजा प्रसाद तीर्थ
ईत्यर्थ

ढोल नगारे ताशे झांजा
नव्या युगाचे आले राजा
कडु आंबट  अनुभवात मौजा
रंजन ज्ञान  समर्थ
ईत्यर्थ

# ईत्यर्थ क्रम

| | |
|---|---|
| १. आमचं पोट भरलं ना! बस्स | राहुल अरुणाकिशन रणसुभे |
| २. जीव द्यावासा वाटतोय | रुचिरा कुलकर्णी |
| ३. इरॉम चानू शर्मिला | अनघा हिरे |
| ४. महागाई | सी वाय दामले |
| ५. अशी पाखरे येती | प्रा लक्ष्मण शिंदे |
| ६. पसारा | वैशाली वर्तक |
| ७. ये हसीं वादियॉं | उमा रानडे |
| ८. उत्तर | रंजन कंधारकर |
| ९. सदा माजगांवकर | सुधीर मुळीक |
| १०. एक मुक्त जीव | मनिषा नाईक (माऊ) |
| ११. खोल दो(सआदत हुसेन मंटो) | विशाल कुलकर्णी |
| १२. आवराआवरीचा पसारा | श्रीपाद कुलकर्णी , |

# आमचं पोट भरलं ना! बस्स... मग!

मुलगा-मुलगी शिक्षणासाठी अथवा नोकरीसाठी घराबाहेर पडले की, त्याचा सर्वात मोठा प्रश्न असतो ते म्हणजे जेवण. त्यातल्या या प्रश्नाची मुलामुलींपेक्षा त्यांच्या आईवडीलांना खूप मोठी चिंता असते. माझे लेकरु काय जेवत असेल, तिथे त्याला पोटभर जेवायला मिळते की नाही, चांगले जेवायला मिळते की नाही असे अनेक प्रश्न त्यांच्या डोक्यात सुरू असतात. जर त्यांचा फोन आला तर त्यांचा पहिला प्रश्न हाच असतो 'जेवण केलं का?', 'मेस चांगली आहे का?' 'पोटभर जेवतोस ना?' एवढे प्रश्न झाल्यावर मग इतर गोष्टी सुरु होतात. हे तर झालं घरच्यांचे. परंतु घराबाहेर असलेल्या मुला मुलींना एक वेगळेच टेन्शन असते; ते म्हणजे, आज मेस मध्ये जेवायला काय असेल? एक वेळची मेस असेल तर संध्याकाळी कुठे जेवायला जायचे, त्यातल्या त्यात मेस खराब असेल तर मुलं नीट जेवण करत नाहीत, असे असंख्य प्रश्न असतात. त्यामुळे घराबाहेर असताना जेवण चांगलं मिळालं, की सर्व काही चांगलं वाटायला लागतं.


राहुल अरुणाकिशन रणसुभे

शास्त्रीनगर, औरंगाबाद.

rahulakransubhe@gmail.com


माझी मेस चांगली आहे. एक आजी ही मेस चालवतात. आम्ही त्यांना माई म्हणतो. रोज गरम गरम त्या जेवायला वाढतात. दर रविवारी एखादा गोड पदार्थ असतोच जेवणात. तसेच महिन्यातून कधी मधी, पावभाजी, दोसा, इडली असे बदल करुन त्या आम्हाला खूष करतात.



मी पुण्यात आल्यापासून त्यांच्याकडेच जेवायला जातो परंतु मला कधीच मी मेसचे जेवतो आहे असे आतापर्यंत जाणवले नाही. त्यांच्या घरातील इतर सदस्य सर्व मेसचे मुले जेवल्यावर जेवण करतात. मला सागरने (माझा औरंगाबादचा मित्र) या मेस मध्ये नेले होते. तो इथे

आल्यापासून माईंकडेच मेसला आहे. त्याला आता जवळपास 1 वर्ष होत आले आहे. सध्या आम्ही दोघांनी एक वेळचीच मेस लावली आहे. कारण आमच्या नोकरीची वेळ ही दिवसभर असते आणि नोकरीचे ठिकाण हे मेस पासून खूप दूर आहे, त्यामुळे रात्रीचे जेवण आम्ही माईंकडे करतो आणि दुपारचे कुठेतरी बाहेर. हा आमचा नेहमीचा दिनक्रमच झाला आहे. माझ्या नोकरीची शिफ्ट बदलत असल्यामुळे मी कधी दुपारी तर कधी रात्री असे एक वेळ माईंकडे जेवायला जातो. परंतु आमच्या रुममधला विवेक याची जेवणाची चांगलीच पंचाईत होते. त्याच्या नोकरीचा टाईम फक्त जाण्याचा ठरलेला असतो परंतु येण्याचा टाईम कधीच नक्की नसतो. तो सकाळी 9 वाजता जातो तर रात्री 10 तर कधी-कधी 12 सुध्दा वाजतात त्याला येण्यासाठी आणि इतक्या रात्री कोणतीच मेस चालू नसते. माईंची मेस तर 10 वाजताच बंद होते. त्यामुळे विवेकच्या जेवणाची रोजच पंचाईत होते. दूपारचे जेवण तो ऑफिसजवळ असलेल्या एखाद्या हॉटेल मध्ये करतो. रात्रीच्या जेवणाची पंचाईत होते म्हणून तो सागरला फोन करुन डब्बा आणायला सांगतो. डब्बा म्हणजे जेवणाचे पार्सल. परंतु त्याची आवडती मेस ही सुध्दा 10 वाजता बंद होते आणि तो बऱ्याच वेळा सागरला फोन करायला विसरतो. त्याला फोन करायचे आठवते तेव्हा जवळपास 10.30 वाजलेले असतात. हे त्याचे नेहमीचेच असते.

आज सागर, गजानन, मंदार (ही सर्व पुण्यातील मित्रमंडळी) आणि मी आम्ही फिरायला गेलो होतो. रात्र तशी खूप झाली होती. फिरता फिरता सागरने आम्हाला एका पराठा सेंटरवर नेले. मी त्याला विचारले, की आपण इथे का आलो आहोत? तेव्हा तो म्हणाला, की अरे विवेकसाठी पार्सल घ्यायचे आहे. तिथे पराठा 20 रु पासून 35 रुपयांपर्यंत फक्त एक पराठा मिळायचा. पुण्यात सर्वच गोष्टी महाग आहेत आणि खाण्या पिण्याच्या गोष्टी तर खूपच महाग. म्हणजे तुम्ही जास्त पैसे देऊन सुध्दा तुम्हाला थोडेसेच खायला मिळणार. तसा विवेकचा पगार सुध्दा असा खूप काही नाही. त्याच्या या रोजच्या जेवणाचे पैसे खर्च करुन त्याला किती उरतात ते देव जाणे. परंतु त्याचा हा रोजचाच दिनक्रम आहे. कधी तो लवकर आला तर मग तो त्याच्या आवडीच्या मेसवर जेवायला जातो. परंतु असे फार क्वचीतच घडते, आणि आज हा महागडा पराठा. मी सागरला एक उपाय सुचवला की, आपण त्या चायनिज गाडीवरचे फ्राईड राईस घेऊ. तसे विवेकला भात खूप आवडतो आणि ते फ्राईड राईस एका प्लेट मध्ये खूप जास्त येते. त्यामुळे मी सागरला फ्राईड राईसच घेण्यास सांगितले. सागरला सुध्दा हा उपाय आवडला.

त्याने विवेकला फोन लावला आणि विवेकने सुध्दा फ्राईड राईसला होकार दिला. मग आम्ही त्या फ्राईड राईसचे पार्सल घेऊन घराकडे निघालो.



पार्सल घेऊन घराकडे निघताना माझ्या डोक्यात अनेक प्रश्न पडायला लागले की, आज विवेकवर असा प्रसंग आला आणि तो नोकरीला असल्याने त्याला हे जेवण सुध्दा परवडणारे होते. परवडणारे म्हणजे तो याचा खर्च उचलू शकत होता. परंतु आज या मोठ्या शहरात अशी हजारो कुटूंबं, मुले, मुली आहेत ज्यांना एकवेळचे जेवण मिळवण्यासाठी सुध्दा खूप धडपड करावी लागते. परंतु एवढी धडपड करुन सुध्दा त्यांना मिळणारा मोबदला या महागाईचा सामना करु शकत असेल का? त्यांना त्यांच्या जवळ असलेल्या पैशातून दोन दिवसातून एकदाच जेवण करावं लागत असेल असं तर नाही ना! कारण पुण्याची महागाई ही तर औरंगाबादच्या (माझे गाव) महागाई पेक्षा दुप्पट आहे, आणि गरीबांना मिळणारा मोबदला हा जवळपास सारखाच असतो. त्यामुळे ते या ठिकाणी कसे काय जगत असतील हा विचार मला सतावू लागला. आज मोठ्या शहरात कुपोषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. याचे एक कारण म्हणजे ही महागाईच. काय होईल या शहराचे, देशाचे आणि या देशात राहणाऱ्या गरीब जनतेचे, असे प्रश्न डोक्यात गोंधळ घालत होते.

प्रत्येक जण आपण व्यवस्थित आहोत ना, आपल्याला दोन वेळचे व्यवस्थित मिळते ना.. मग जगाची चिंता कशाला करायची हाच विचार करत असतो.. तसेच काही माझे सुध्दा झाले असावे.. मी सुध्दा कधीतरी असेच पार्सल आणून जेवतो आणि शांतपणे झोपून राहतो.. आमचं पोट भरलं ना बस्स..मग जगाची चिंता कशाला...

# जीव द्यावासा वाटतोय...

काय येतं मनात हे वाचुन? की हे कोण्या असाध्य रोग झालेल्या व्यक्तीचं मनोगत असावं.. किंवा कुठ्ल्यातरी मोठ्या प्रश्नात फ़सलेल्या मनाची व्यथा.. हो नं? पण नाही.. हे आहे आजच्या माझ्या पिढीचं वाक्य. बरेच दिवस हा विषय डोक्यात घोळत होता. आजकालची ही माझी तरुण पिढी इतकी एकाकी का? असं नक्की काय वेगळं शिजत असतं आमच्या मनात की आम्ही ते




सहन नाही करु शकत आणि एकदम शेवटाचा विचार करतो? असं काय नेमकं कारण असतं कि आमचे टेंशन आम्ही कोणाशीच वाटून नाही घेऊ शकत? आणि सर्वात महत्वाचं म्हणजे असं काय असतं जे आम्हाला सरळ मरण हा एकच रस्ता ठेवतं??

तसं पाहायला गेलं तर हे सगळं थोड्याफ़ार फरकाने आपल्या आई-बाबांच्या काळात पण होतं(आता तुम्ही म्हणाल तो काळ वेगळा होता). घर आणि ऑफिस ते पण सांभाळायचे (अगदी आपल्या सगळ्या अनावश्यक "गरजा" पुरवत)मग आज काय असं बदललंय आज?

थोडा विचार केला तर लक्षात येतो तो एक महत्वाचा फरक... 'तुटलेली घरं'..! आज थोडं आजुबाजुला बघितलं की दिसतात ती परगावात एकटीच राहणारी मुलं.. एकाकी.. अस्वथ.. अचानक आलेल्या ह्या जबाबदाऱ्या न पेलता येणारी.... आणि खरं सांगायचं तर रोज एका

रुचिरा प्रदिप कुळकर्णी

पुणे

ruchirakulkarni1@gmail.com

नव्या दिव्यातून जाणारी.. पण म्हणुन जीव संपवणं हा एकच उपाय?

जरा आपल्या पालकांच्या बाजुने विचार केलाय कधी ह्या गोष्टींचा? त्यांचं हे बाळ जे कालपर्यंत कॉलेजच्या मौजमस्तीमध्ये गुंग होतं..हसत खेळत होतं.. ते आज अचानक असं गप्प..घुमं..सतत ताणाखाली.. काय होत असेल त्यांच्या काळजाचं? कालपर्यंत कान किटेस्तोवर मोठ्ठ्याने गाणी ऐकणारा आपला मुलगा आज साध्या सुरांनेही हळवा होताना बघितलं की त्यांना धक्का बसणारच.. त्यांचं फक्त एकच मागणं असतं की बाबारे आमच्याशी नको पण कोणाशीतरी बोल.. मोकळा हो... बाप जरा तरी समजू शकतो ही परिस्थिती(बॉसची अरेरावी, कामाचं ओझं, ऑफिस मधलं पोलिटिक्स.. सगळं त्याने पण अनुभवलं असतं) पण आई.. ती बिचारी मात्र काळजीने अर्धमेली होते आणि त्यातच रोज पेपरात नवीन बातमी.. "आय.टी. कंपनीत गलेलठ्ठ पगारावार काम करणाऱ्या तरुणाची आत्महत्या"... एक क्षण विचार करा काय वाटत असेल हो त्या माउलीला... असा तरुण पोरगा गमावलेल्या बापाच्या नजरेत कधी बघितलंय.. तिथे सापडतो फक्त भकासपणा.. आणि भल्या मोठ्या प्रश्नांचं भेंडोळं.. ज्याची उत्तरं तो उरलेलं सारं आयुष्य शोधत बसतो... प्रत्येक क्षण त्याला एकच प्रश्न सतावतो.. माझं कुठे चुकलं माझ्या बाळाला समजून घेण्यात.. अर्धं आयुष्य मुलांना वाढवण्यात घालवायचं आणि उरलेलं त्यांच्या मरणाची कारणं शोधत.. हा कुठला न्याय?

आता तुम्ही म्हणाल आम्हाला पटतंय हे सगळं.. पण आम्हाला रोज काय काय भोगावं लागतं हे बाबांना काय सांगणार? सतत समोर राहण्याची धडपड, बॉसने सगळयांसमोर केलेला पाणऊतारा,कितीही मन लावुन काम केलं तरी हात रिकामाच.. कोणाला अन् काय काय सांगायचं असचं नं..




खरंतर आई-बाबा, तुम्हाला हे सगळं सांगावं असं खूपदा वाटतं. पण तुम्ही काळजी करता हो.. आणि तसं बघितलं तर असं मुद्दाम सांगण्यासारखं पण नसतंच काही... असते ती फक्त अनिश्चितता.. आणि त्यातून येणारं हे फ़्रस्ट्रेशन...आता हे सगळं मित्रांशी बोलवं तर

आम्ही चार मित्र जगाच्या चार टोकांना..इथे आमच्या साध्या दिवस-रात्रीचा मेळ जुळत नाही तर बोलणार कधी आणि कसे? आता ह्यावर आम्ही एक उपाय शोधलाय तसा... मायाजाल.. इंटरनेट.. चॅटींग... तुम्हाला वाटतं हा समोरासमोर आमच्याशी दोन शब्द बोलत नाही आणि तिथे तासनतास बोलत काय बसतो.. आणि ह्या गोष्टीचं तुम्हाला कुतुहूल कमी आणि रागच जास्त असतो. पण खरं सांगु हे जग आवडतं आम्हाला. (कसलं मेलं हे व्हर्च्युअल जग आवडतं, खरं खरं काहीच नको असतं ह्यांना-इति आई). कारण इथे नसतो अस्तित्वाचा पडदा... नसते भिती गुपितं कोणाला कळायची... फक्त व्यक्त होणं हीच तर गरज असते नं आमची? इथे पण मिळतातच की आम्हाला नवीन नाती.. अगदी काका,मामापासून ते ताई, मित्र, यार पर्यंत... आम्हाला कळते हो तुमची काळजी...

पण आमचं जगच इतकं अस्थिर झालयं नं... सतत हलत राहतं सगळं आतपर्यंत... मनाच्या तळापर्यत... जरा कुठे श्वास घ्यायला थांबावं म्हटलं की संपतंच सगळं.. अन् हरवतो असंच ह्या गर्दीत.. आणि मग शोधत बसतो स्वतःला ह्या प्रचंड पसाऱ्यात.. आमच्यातलेच काही हा शोध पण घेत नाहीत. सरळ संपवतात हे सगळं... हा गोंधळ... काही सापडतात कोण्या बाबाच्या आश्रमात.. शांतता शोधत.. अन् काही... अचानक स्वतःच शांत होत जातात.. बसतात आभाळाकडे नजर लावुन...

# इरॉम चानू शर्मिला

सन २००० च्या नोव्हेंबर पासून मणिपुरमध्ये इरॉम चानू शर्मिला यांनी सामान्य जनतेवर खूप मोठ्या प्रमाणात होत असलेल्या अत्याचाराच्या विरोधात आंदोलन छेडले. लष्कराला प्रदान करण्यात आलेल्या विशेषाधिकार कायद्याचा गैरवापर करून या भागातील जनतेवर विशेष करून महिलांवर अत्याचार होत आहे आणि त्याकडे प्रशासन सुद्धा दुर्लक्षच करत आहे. या विरोधात आणि विशेषतः हा विशेषाधिकाराचा कायदा मागे घ्यावा यासाठी इरॉम शर्मिला यांनी सुरु केलेल्या उपोषणाला ह्या ४ नोव्हेंबरला ११ वर्षं पूर्ण झाली आहेत. इतक्या लांबवर चालणाऱ्या उपोषणाचे दुसरे कुठलेही उदाहरण नाही. इरोम शर्मिला ना फक्त लोकतंत्रातील नोकरशहा आणि सैन्यदलाच्या विरोधात लढत आहे तर आपल्या मृत्युशी सुद्धा झुंज देत आहे. इरोम शर्मिला यांनी जेव्हा उपोषण सुरु केले तेव्हा त्या केवळ २८ वर्षांच्या होत्या. लोकांना वाटले तारुण्याच्या जोशात त्यांचे हे आंदोलन चालेल आणि थोड्या कालावधीतच बंद पडेल. परंतु जसजसा वेळ पुढे सरकत गेला लोकांना त्यांच्या लढ्याची तीव्रता जाणवायला लागली



अनघा हिरे

नाशीक

anagha.hiray@gmail.com

दोन नोव्हेंबर २००० ला मणिपूरची राजधानी इम्फाल मलोम मध्ये शांती रॅलीच्या आयोजनाच्या संदर्भात इरोम शर्मिलाने एक बैठक भरवली त्याच वेळी मलोम बससॅन्ड वर सैनिक बलाने बेछूट गोळीबार केला त्या गोळीबारात १० निरपराध लोकांचा बळी गेला. मरणाऱ्या लोकांमध्ये ६२ वर्षीय वृद्ध महिला लेसंगबम इबेतोमी तसेच राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले चन्द्रमणि सामील होते. ही सर्व घटना इरोम शर्मिलाला दुःखी करणारी अशी होती. ह्या घटने नंतर इरोम साठी शांती रॅली काढून झालेल्या कारवाईला विरोध दर्शवणे अप्रासंगिक वाटू लागले. तेव्हा त्यांनी घोषित केले की हे

सर्व आता सहन करण्याच्या पलीकडे झाले आहे. निशस्त्र जनतेविरुध्द सशस्त्रीयानी केलेली कारवाई आहे. त्यांनी मणिपूर मध्ये लष्कराचा अतिहस्तक्षेपाच्या विरोधात एक नैतिक युद्ध सुरु केले. त्यांनी ३ नोव्हेंबर २००० च्या रात्री शेवटचे अन्न ग्रहण केले आणि चार नोवेंबर पासून त्यांनी उपोषण सुरु केले.

ह्या उपोषणं नंतर लगेच तीन दिवसांनी सरकारनी त्यांना अटक केली. त्यांच्यावर आत्महत्या करण्याचा आरोप ठेवून ३०९च्या अंतर्गत त्यांना पोलीस निरीक्षणाखाली अटक करून ठेवण्यात आले आहे.

उपोषण सुरु केल्या नंतर जेव्हा त्यांची तब्येत ढासळत गेली तेव्हा त्यांना त्यांच्या प्रतीकारा नंतरही रुग्णालयात भरती केले गेले. त्यांना एका खोलीत डांबून ठेवले आहे. त्यांच्या नाकात नळया लावल्या आहे.या नळयाद्वारे त्यांना बळजबरीने अन्नपुरवठा व औषध पुरवठा केला जात आहे आयुष्य वाचवण्याच्या नावाखाली त्यांच्या नाकातील नळयातून द्रव पदार्थ बळजबरी शरीरात टाकले जात आहे. त्यांच्यावर कडक नजर ठेवण्याचे कारण असे सांगण्यात येते की त्यांनी आत्महत्या करू नये. त्यांच्या न्यायाचा पडसाद मणिपूर मधील जनतेत पडू नये म्हणून त्यांच्या बोलण्यावर तसेच लोकांच्या भेटण्याच्या स्वातंत्रावर निर्बंध घालण्यात आले आहेत. आणि हे लोकशाही देशात गेल्या दशकापासून चालू आहे . ३०९ धारा च्या अंतर्गत एक वर्षा पेक्षा जास्त काळ कुणालाही न्यायालयीन अटकेत ठेवता येत नाही त्यामुळे एक वर्ष पूर्ण होताच त्यांना सोडण्याचे नाटक केले जाते आणि परत त्यांना अटक केली जाते . आणि पुन्हा त्याच कोठडीत डाम्बले जाते. शर्मिलाच्या मागण्यांवर सरकार विचार करायला तयार नाही.



:आफ्सपा:च्या विरोधात शर्मिलाचे आंदोलन आहे. मणिपूरसारख्या राज्यात लष्करी हस्तक्षेप असलेल्या राज्यांमध्ये( केंद्राशाशित प्रदेशांमध्ये ) लोकशाहीची पुरेपूर वाट लागली आहे. मणिपूर सारख्या राज्यात गेल्या ५३ वर्षांपेक्षा जास्त कालावधी पासून नागरिकांना आपला

जीव गमवावा लागला आहे. एका बाजूला अपमान, बलात्कार , अटक तर दुसऱ्या बाजूला तीव्र घृणा आत्मदहन, आत्महत्या, असंतोष आक्रोश पसरलेला आहे २००४ च्या दरम्यान मणिपूरच्या महिलांनी ह्या व्यवस्थेच्या विरोधात व स्त्रियांवर बंदुकीच्या धाकात केलेल्या बलात्कारांच्या विरोधात कांगला फोर्टच्या समोर  नग्न अवस्थेत भारतीय सैनिकानो या आणि आमच्यावर बलात्कार करा अश्या प्रकारचे बॅनर घेऊन आंदोलने केली. ही गोष्ट पण विसरण्यासारखी नाही.

इरोम शर्मिलाचा हा  संघर्ष ह्या वर्षभरातच जास्त चर्चेत आलाय. अण्णा हजारे यांच्या आंदोलनाचे समर्थन  करताना इरोम शर्मिलाने अण्णांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे अण्णांना अहिंसक  मार्गाने विरोध करायचे स्वतंत्र मिळाले तर त्यांना स्वतःला केलेल्या आंदोलना विषयी काळ कोठडी मिळाली. इरोम शर्मिलाचे हे बोल लोकशाहीतील तफावत नजरेस आणून देतायेत. ही एक अशी लोकशाही आहे की इथे भारतीय राज्य अशांत क्षेत्रामध्ये आपल्याच जनतेच्या विरोधात अघोषित युद्ध करत आहे .

इरॉम शर्मिलाचा लढा एका मूलभूत गोष्टीसाठी ती म्हणजे मणिपूर, आसाम, मेघालय, नागालॅंड या भागातील महिलांना भीतीरहित जीवन जगता यावे . महिलांना मुक्तपणे घराबाहेर फिरता यावे व  परत  सुरक्षित घरी परतता यावे. लष्कर किंवा कुठल्याही दहशतवादी संघटनेच्या व्यक्तीकडून मध्यरात्री उचलून नेऊन अन्याय होणार नाही एवढीच तर हमी हवी आहे. राष्ट्राची प्रमुख व्यक्ती  एक स्त्री असताना ही हमी द्यायला प्रशासन  पुढाकार का घेत नाही?

नर्मदा बचाव सारख्या अनेक सामाजिक संघटना इरॉम शर्मिलाच्या लढ्याकडे मानवतेच्या दृष्टीकोनातून बघण्यात यावे एवढीच मागणी शासनाकडे करत आहे.

ईशान्य भारतातील जनतेवर होत असलेल्या लष्करी अत्याचाराच्या विरोधातील या दशक भराच्या लढ्यात इरॉम थकलेली नाही. ती म्हणते सत्याचीच नेहेमी जीत होत असते त्यामुळे एक दिवस मी जिंकेनच. आणि तो पर्यंत माझा लढा चालूच राहणार.

# महागाई

सी. वाय. दामले

सरकारने पुनः एकदा पेट्रोलची दरवाढ केली. गेल्या काही वर्षात खूप वेळा हे झाले. पुन्हा एकदा भाववाढ. हे चक्र असेच चालणार का? आमचे पंतप्रधान एक नाणावलेले अर्थ तज्ञ आहेत. त्यांच्या दिमतीला मोन्टेक सिंघ आणि प्रणव मुखर्जींसारखे चांगले लोक आहेत


चिंतामणी दामले

सहकार नगर २, पुणे

cydamle@gmail.com


इथे काही मते मांडत आहे .
ही मते / हे उपाय एका सामान्य नागरिकाच्या चष्म्यातून आलेले आहेत.

भाववाढ हि आटोक्याबाहेर जाते आहे हे साधारणपणे २ वर्षांपूर्वी समजू लागले होते. तेव्हा जे उपाय केले गेले ते प्रामाणिक होते पण अपुरे होते.

ही भाववाढ होते आहे ती चढ्या भावात सुद्धा लोक खरेदी करतात त्यामुळे असा विचार करणे ही आत्मवंचना ठरेल. आज कोण खरेदी करतेय आणि काय ?
विकास दराचा फार उदो उदो करण्यात आला आणि येतोय पण विकास दर हा अनेक निकषांपैकी एक निकष आहे. इतर निकष जर विरुद्ध असतील तर विकास दर हा फसवा ठरू शकतो. उदाहरणार्थ : समजा कार्स चे उत्पादन २००००० ने वाढवले तर GDP चा दर हा एखाद्या टक्क्याने वाढू शकतो. ही वाढ फसवी ठरू शकते. आणि आज हा विकासदर सुद्धा खाली येऊ लागला आहे. मंदी च्या विळख्यात देश सापडत असताना नेतृत्व अधिक सजग हवे. नुसते सवंग ( populist ) निर्णय घेऊन चालणार नाही .

गेल्या २ वर्षात गॅसची ही दरवाढ झाली. त्याचे कारण म्हणजे त्यावरील अनुदान कमी करण्यात आले असे सांगण्यात आले. हा काय प्रकार आहे? जेवढा gas चा वापर कमी तेवढा इतर महागड्या इंधनाचा खप जास्त किंवा प्रदूषणकारी आणि पर्यावरण विरोधी इंधने ( उदा : लाकूड ) यांचा खप जास्त.

आणि Gas वरील अनुदान कमी केले गेले आणि चिप्स सारखी चंगळवादी गोष्टींचे उत्पादन करणाऱ्या MNC न कर माफ. तसेच मॉल किंवा मल्टीप्लेक्स ना कर माफ. ह्या अशा निर्णयांनी काय साधते? याने नको त्या गोष्टींची मागणी वाढत नाही का? जी गोष्ट करमाफीची तीच सरकारी गुंतवणुकीची!

२०-२५ वर्षांपूर्वीचे कपडे किंवा वनस्पती तूप सुद्धा सार्वजनिक उद्योगातून निर्माण करणारे सरकार आज वीज निर्मिती सुद्धा करू शकत नाही. बदलत्या जमान्यात खाजगीकरणाला पर्याय नाही. पण नफेखोरीला तर आळा घालता येतो.

गुंतवणूक हि पायाभूत उद्योगात हवी पण राष्ट्रीय महत्वाच्या उद्योगात सरकारी नियंत्रण हवेच. अतिशय चांगल्या पायाभूत सुविधा ( infrastructure ) असणाऱ्या BSNL , ST , MSEB सारख्या सरकारी संस्था आज दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आहेत. त्यांच्या जीवावर ही खासगी बांडगुळे मात्र फोफावली. खासगीकरण हे सरकारी अकार्यक्षमतेला पर्याय ठरेल , ग्राहकाला चांगले पर्याय उपलब्ध होतील असे सांगण्यात आले होते. आज कार्यक्षमता चांगली आहे ती फक्त नफेखोरीची. बांगलादेशातून कपडे स्वस्तात करून वेस्टर्न ब्रांडस च्या नावाने इथे विकून नफा कमावणे ह्यात कोठे दिसतो विकास? कोठे आहे ग्राहकाचे हित ?

विदेशी गुंतवणूक येते ती नफा कमावण्यासाठी. हे उघड आहे. पण निदान त्याला लागणारा कच्चा माल किंवा पायाभूत सेवा ह्या देशातूनच उपलब्ध व्हाव्यात अशी अट का नको ?

आर्थिक उदारीकरणाचे खूप फायदे झाले. उत्पन्न वाढले. जीवनाचा स्तर उंचावला. रोजगार निर्माण झाले. पण ह्या विकासाला असणारा यांत्रिक चेहरा काढून त्याला मानवी चेहरा देणे हे आपले कर्तव्य आहे.

एक उदाहरण देतो. मानवी चेहऱ्याचे .

आज डेन्मार्क सारख्या देशाने जास्त fat असणाऱ्या पदार्थांवर जास्त कर बसवले आहेत . त्याने अनावश्यक किंवा चोचले पुरवणाऱ्या गोष्टींच्या खरेदीला आळा बसतोय. हा कर आर्थिक संकटाला तोंड देणाऱ्या निधीला जातो. असे अनेक उपाय आहेत. वाढत्या संख्येने दुचाकी वाहने रस्त्यावर येत असतात.आणि डीझेल चे भाव वाढवून आणि पर्यायाने सार्वजनिक वाहतूक व्यवस्था महाग किंवा अकार्यक्षम बनवून ह्या प्रवृत्तीला खतपाणी घातले जाते. इथे सरकारची जबाबदारी मोठी आहे. पेट्रोलजन्य पदार्थांची भाववाढ करताना नफ्या तोट्या बरोबरच त्याचे दूरगामी परिणाम लक्षात घेतले जाणे अपेक्षित आहे.

कर्ज किंवा व्याज माफी करणे हे काही मते किंवा सत्ता देईल पण त्याने सरकार काय साधते? ही अशी किंवा फुकट तांदूळ, मंगळसूत्र, वीज, laptop अशी आश्वासने देणे हि लाचखोरी नाही का?

कोठलीही फुकट दिलेली गोष्ट ही सरकारचा भार वाढवते. मंत्र्यांनी आणि कार्यकर्त्यांनी फ्लेक्स बोर्ड लावण्याचा दरिद्री उद्योग करण्यापेक्षा आपल्या मतदारसंघात कोठे काय चुकते ते बघणे जास्त योग्य नाही का ? साधे उदाहरण द्यायचे तर एकच रस्ता वर्षात २ ३ वेळा केला जातो. त्याचे पैसे, लाच दिली जाते. आणि रस्ता मात्र त्याच्या खड्ड्यांसकट आहे तसाच राहतो.

विरोधी पक्ष पण कोठेच विधायक भूमिका घेताना दिसत नाहीत. दिखाऊ आंदोलने, मोर्चे आणि सर्वात करंटेपणा म्हणजे विधान सभा किंवा लोकसभा यांचे कामकाज बंद पाडणे यातच विरोधी पक्ष रममाण दिसतात.

सामान्य माणसाला कोठेच समर्थ राजकीय पर्याय दिसत नाही.

# अशी पाखरे येती

प्रा.लक्ष्मण शिंदे

रामानंदनगर, ता. पलुस, जि. सांगली

proflaxmanshinde@gmail.com

आजकाल टू व्हिलर गाडयांचे अपघात खूप वाढले आहेत. त्या अपघातांतील मृत्यूंचे किती खोलवर परीणाम होतात. हे सांगणे कठीण आहे. या अपघातांत कानात वारे शिरलेले तरूण जास्त असतात. त्यांना वेगामधला थरार रोमांचक वाटतो. तो थरार त्यांनी अनुभवलेला असतो. परंतु त्यांनी ऐन तारूण्यातील मुलगा वारलेल्या आई-वडिलांचे खचलेले चेहरे पाहिले असतात का? असा प्रश्न पडतो. किती खोलवर असतात त्यांच्या वेदना! आपले आयुष्य इतके साधे आणि स्वस्त आहे का? असा विचार डोक्यात येतो. आयुष्यात केवळ कुटुंबासाठीच नव्हे तर समाजासाठीही करण्यासारखे भरपूर काही असते. या बाबींचा ही तरूणाई विचार करणार की नाही?

बीए दोनमध्ये शिकणा-या माझ्या रोहीत या विद्यार्थ्याचा टू व्हिलरवरून जाताना रविवारी रात्री भयंकर अपघात झाला. अज्ञात वाहनाने ठोकरल्याने त्याचा मृत्यू झाला. अनेक वर्षांच्या प्राध्यापकीनंतर मलाही आयुष्याचे महत्त्व तरूणांना पटवून देण्यात आपण कमी पडतो की काय? असे वाटू लागले. ही बातमी सोमवारी सकाळी स्टाफरूममध्ये वर्तमानपत्रात पहिल्या



पानावर वाचली. विश्वास बसेना. सुन्न झालो. शांतपणे बाहेर पडलो. काही उत्साही मुलं श्रध्दांजलीचा फलक लिहीत होती. मला वाटलं यातली किती मुलं व बातमी वाचणारे किती लोक गाडी चालवताना प्रत्येक क्षणी या भयंकर अपघाताची जाणीव ठेवतील? का हळूहळू सगळं विसरून पुन्हा कुठेतरी अशीच हृदयद्रावक घटना घडल्याचे वाचावे

लागणार? भांडवलशाही व्यवस्थेत आपल्या संवेदना किती बोथट झाल्या आहेत. सगळं कसं आपण पटकन विसरू लागलो आहोत.

त्या दिवशी मला पुढचे तास घेणे अवघड झाले. त्याचा हसरा उत्साही चेहरा समोरून हटत नव्हता. माझ्याशी तर तो आदराने वागायचाच. पण महाविद्यालयातील सर्वांचाच तो आवडता होता. प्राध्यापकांच्यात तर त्याच्या चांगुलपणाच्या चर्चा होत्याच. पण काही दिवसांनंतरही त्याचे मित्र तो नसल्याने वर्गात बसू वाटत नसल्याचे मला म्हणाले.

तारूण्याच्या ऐन उंबरठयावर वयाच्या नुकत्या विशीमध्ये तो गेला. अत्यंत हृदयद्रावक घटना. तो आजपासून दिसणार नाही. एक आवडता विद्यार्थी गेल्याचे दुःख खूप खोल व कायमचा घाव घालणारे होते. शनिवारचा माझा हा त्याच्या आयुष्यातील शेवटचा तास ठरला. मुलांनी मला सांगीतले की तो 'एकटा असलो तरी सरांच्या तासाला बसणार' असे म्हणायचा. सतत वेगवेगळया कारणांनी त्याची आठवण येते. त्याच्याबद्दल बोलताना शब्द अपुरे पडतात.रेव्हरंड टिळकांनी एके ठिकाणी म्हटलय

"अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवूनी जाती

दोन दिसांची रंगत संगत दोन दिसांची नाती."

तो वैयक्तिक कामांसाठी कॉलेजमध्ये कधीही त्रास देत नव्हता. वेळ घेऊन घरी यायचा. त्याने अनेकदा त्याच्या घरी बोलवले होते. परंतु त्याच्याकडे जाणे जमले नव्हते. दुर्देवाने त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या घरी जाण्याचा दिवस पहावा लागला. त्याचे घर पाहिल्यावर चांगल्या आर्थिक परिस्थितीची कल्पना आली. मला एक बाब प्राकर्षाने जाणवली की त्याला श्रीमंतीची कसलीही मस्ती नव्हती. खरं तर ऐश्वर्य आणि नम्रता या अपवादानेच एकत्र आढळणा-या गोष्टी त्याच्याकडे होत्या. एखादया पित्याला आपल्या तरूण मुलाच्या प्रेताला खांदा दयावा लागणं ही अत्यंत हृदयद्रावक घटना असते असे म्हणतात. ते काय असते.याची प्रचिती आली. त्याचे वडील अश्रू आवरू शकत नव्हते. त्यांचा चेहरा पहाणे अवघड होते. त्यांच्या भेटीचा प्रसंग हृदय पिळवटून टाकणारा होता.

सर्वच वहानचालकांनी आपली आयुष्ये कुणाकुणाशी जोडलेली असतात याचा विचार करून काळजीपूर्वक वहाने चालवावीत. हीच अपेक्षा!

# पसारा

वैशाली वर्तक

मी कामानिमित्य बाहेर गेले होते. बाहेरून आले. घरात पाऊल टाकले पहावे तर घर म्हणजे इतस्थत: पसरलेले. ज्याला जी गोष्ट वाटली ती घेऊन पुन्हा जागी न ठेवता तिथेच टाकलेली. पहावे तिथे पसरलेला पसारा. वाटले पुन्हा घराबाहेरच जावे. घरात जाऊच नये. म्हणजे दृष्टी आड सृष्टी. तो पसरलेला पसारा पहाणे नको व पसारा आवरणे नको. पण छे! बाहेर तरी किती वेळ रहाणार. एक तास ,दोन तास.



मग घरी येऊन तरी पसारा पहाणे व आवरणे आलेच ना? आणि आपल्या शिवाय कोण आवरणार? मेल्या शिवाय स्वर्ग दिसत नाही. तेव्हा मरण आलेच म्हणजे ओघाने आवरणे आलेच. तेव्हा मी मुलांना हांका मारीत आत आले. अरे मुलांनो तुम्ही केलेला तुमचा रोजचा पसारा आवरा. त्यावेळी आजी मात्र हंसत हंसत गाणे गुणगुणत होती. मला मात्र तिच्या गाण्याचा त्रास वाटत होता. त्या पसा-यांनी मला त्रास होतोय ,डोके फिरतंय कोठून आवरू सुचत नाही आहे आणि ही मात्र मजेत गुणगुणत आहे

*अरे हा खेळ दुनियेचा*

*पसारा मांडिला सारा*

माझी तोंडाने बडबड चालूच होती. " कुठल्या ही खोलीत जावे जिकडे तिकडे पसरलेले. रोजचे रोज किती ही आवरा तरी पुन्हा तेच पसरून ठेवलेले. पसारा आवरणे काही संपत नाही. मुलांच्या खोलीत जावे व पहावे तर त्यांनी त्यांच्या खोलीत पुस्तके, कपडे, खेळणी जे हवे ते घेऊन बाकी इकडे तिकडे पसरून ठेवलेले असते त्यांचा सारा आवरून हॉल मध्ये यावे तर सकाळचे पेपर वाचून झाल्यावर वर्तमान पत्राचे प्रत्येकाने पानन पान वेगळे करून

वैशाली वर्तक

अहमदाबाद

avvartak@yahoo.com

वाचल्याने, तेथे पेपरचा पसारा. सकाळी चहा नास्त्याच्या डायनिंग टेबलावर कपबशा नास्त्याच्या डिशेस त्याच बरोबर इतर वस्तूंचा पसारा असतो". तेव्हा थोडक्यात काय सकाळी उठल्यापासून रात्री झोपे पर्यंत पसारा करणे व पसारा आवरणे चालूच असते. व जीवन जो पर्यंत आहे तो पर्यंत पसारा आवरणे हे असेच चालणारच. एवढेच नव्हे तर जन्मापासून मरणापर्यंत पसारा करणे , तो वाढविणे आवरणे हे पण चालूच रहाणार.

तेव्हा ह्या विचारांनी मला आजी गुणगुणत असलेल्या गाण्याचा खरा अर्थ कळला. ती जे गाणे गुणगुणत होती ते गाणेच मला सांगू लागले, की खरा पसारा तर ह्या विश्वकर्माने करून ठेवला आहे. एवढ्या मोठ्या या दुनियेची, जगाची निर्मिती केली आहे. व त्याच्या पसार-या समोर आपला पसारा काहीच नाही. त्याने काय काय पसारा करून ठेवला आहे ,याची त्याला पण भ्रांत नसेल. हे जग व जगाचे रहाटगाडगे, रोजचे नियमित दिनचक्र चालविणे, रोजचे नवनवीन सृष्टीत बदल घडविणे, जुन्याचा नाश करणे, काही ठिकाणी झीज करणे तर काही ठिकाणी वृद्धी करणे हे त्या विश्वकर्माचे चालूच असते त्याचा पसारा व त्याच्या पसा-याचा व्याप फार मोठा आहे.



मनुष्य जन्माला येतो तेव्हा काही न घेता येतो पण देवाने मानवास मेंदू बहाल केल्याने हळूहळू तो जसा मोठा होतो तसा त्याच्या बुद्धीचा विकास होतो, त्यामुळे सुरवातीस आई, वडील, बहिण, भाऊ या जवळीक नातेवाईकांच्या पसा-यात गुरफटतो. पुढे त्याचा कौटुंबिक गोतावळ्याचा पसारा वाढतो. पुढे वस्तूंचा भौतिक गोष्टींचा पसारा तो वाढवित जातो. प्रथम एक घर, एखादी गाडी करता करता जमीन, घरे ,गाडया या भौतिक सुखात अडकून सुखसोयींचा पसारा वाढवितो. मग ह्या पसा-यातून बाहेर निघणे, तो पसारा आवरणे दिवसेंदिवस कठीण जाते. त्याचा पसारा तो वाढतच जातो.

त्या विश्वकर्माच्या पसा-यात पण त्या विश्वकर्माने केवढी जीव सृष्टी तयार करून पसारा मांडीला आहे. जलचर. स्थळ सृष्टीचा समावेश आहे. आणि ही सर्व सृष्टी एकमेकास पूरक

आधारित आहेत .त्याने केलेल्या ह्या पसा-या शिवाय एकमेकांचे जीवन शक्य नाही. या सर्व सृष्टी एकमेकात गुंतलेल्या आहेत. त्याचा हा निसर्गसृष्टीचा पसारा सर्वांना आनंददायी असतो.

पण आपण मानवाने स्वत:केलेला पसारा आवरणे थोडे फार तरी शक्य आहे. भौतिक सुखाच्या पसा-यातून मन तृप्त करणे, मन भरून घेणे, व त्यातून बाहेर निघणे हे जमते व जमू शकते. जसं खूप उपभोगल्यावर मन तृप्त होवू शकते. पण मानवाला त्याने मानसिक पसारा जो मांडीला आहे त्यातून मन काढणे अथवा तो पसारा आवरणे फार कठीण आहे. माझे सखे सोबती,माझा गोतावळा ह्या सर्व पसारा-यातून मन काढणे कठीण आहे. तो पसारा आवरण्यासाठी अध्यात्माचीच जोड लागते, गरज भासते. संताना महापुरुषांनाच जमते बाकी सर्व सामान्यांस त्या मानसिक पसा-याचा मन:स्ताप होतो .

खरेच पसारा जीवनाचा मुख्य घटक आहे. पण एखाद दिवस घर फारच नीटनेटके आवरले असेल व स्वच्छ घरात आपण एकट्याच असलो तरी घर अंगावर येते ना. कारण घरात माणसे, पसारा, आणि त्या पाठोपाठ घराला येणारा जिवंतपणा तर आपल्याला हवा असतो. ह्या विचाराने मी सर्व घर नीट केले व आजीचे गाणे मीच गुणगुणू लागले .

# ये हसी वादिया...

"वादी" हा शब्द उच्चारला की क्षणार्धात ए. आर. रेहमानच्या गाण्याचे स्वर कानात घुमू लागतात आणि डोळ्यांपुढे मणीरत्नमच्या सिनेमातले काश्मीर चे दैदिप्यमान रूप उभे राहते.

ते गगनभेदी पांढरे शुभ्र पर्वत, त्या खोल दऱ्या कपाऱ्या, अंगावर शहारा आणणारा गारवा आणि निसर्गाच्या सानिध्यात ती आणि तो, असे काहीसे romantic चित्र डोळयापुढे उभे राहते. आणि आपण जगात कुठेही असलो तरी मनाने लगेच त्या हिमशिखरावर जाऊन पोहोचतो.


उमा रानडे

ओमान

uma.ranade20@gmail.com


ओमानमध्ये हिमवृष्टी होत नाही. उलट इथे उन्हाळ्यात ४० डिग्री सेल्सियसला पण "गारवा" म्हणायची पद्धत आहे. इथे असंख्य डोंगररांगा आहेत पण ३००० मीटरहून अधिक उंची त्यांना गाठता आलेली नाही. इथल्या हिरवळीला हिरवळ म्हणणे म्हणजे अतिशयोक्ती अलंकाराचेच उदाहरण आहे. (इथे, हिरवळ म्हटल्यावर अनेकांच्या मनात ज्या पालव्या फुटल्या असतील, मी त्या हिरवळीबद्दल बोलत नाहीये. ती हिरवळ खरोखरच बघण्यासारखी आहे.) पण जो नैसर्गिक हिरवा रंग थोड्याफार प्रमाणात आजूबाजूला दिसतो तो इतका गडद आणि फिका आहे कि त्यात तजेला औषधालाही सापडणार नाही. ओमानमध्ये सगळीकडे वाळवंट नसले तरी एक प्रकारचा रखरखाट आहे.

पण तरी अरबिंना "वादी" हि concept माहित आहे. आणि वादीचे नाव काढले कि आनंद, उत्साह, थोडीशी भीती असे अनेक भाव त्यांच्या मनात दाटून येतात. पण अरबी भाषेतील वादी आणि A. R. Rehman च्या गाण्यातली वादी ह्यात वादी-शिखराचा फरक आहे. अरबी भाषेतील वादी म्हणजे डोंगर कपारीतून वाहत येणाऱ्या पावसाच्या पाण्याने तयार

झालेली नदी किंवा तलाव. त्यामुळे इथे पाउस पडला, जो वर्षातून ५/६ वेळाच पडतो कि "वादी आली, वादी आली" म्हणून सर्वत्र जल्लोष केला जातो.

अश्याच जल्लोषात सामील होऊन आज मी आणि माझ्या मैत्रिणी एका वादीकाठी निवांतपणे lunch enjoy करत होतो. दिवसाढवळ्या चार तरुण मुलींनी (बुरखा न घालणाऱ्या) असे एकटेच फिरायला जाणे आणि रस्त्यात कडेला गाडी थांबवून टेबल खुर्च्या लावून टाईमपास करणे, ते हि एका middle eastern देशात म्हणजे थोडे risky वाटते ना.

पण आम्हाला साथ द्यायला असे अनेक तरुण मुलींचे घोळके आले होते. मुले मोटारसायकली चालवण्यात मश्गुल होती आणि मुली चटया घालून चकाट्या पिटण्यात. अनेक ओमानी कुटुंबही आली होती. असे वाटत होते कि निझवा गावाची ८०,००० ची लोकसंख्या आज वादीच्या दर्शनाला आली आहे.



दर्शनच म्हणायचे ते. कदाचित देवाच्या दर्शनापेक्षाही अधिक कठीण. ओमानी लोकांचा धर्म इस्लाम असल्याने मंगळवारी सिद्धीविनायक किंवा गुरुवारी दत्तमंदिरात दर्शनाला जाणे म्हणजे काय ते त्यांना माहित नाही.

खरेतर आपण देवा धर्मावर विश्वास ठेवणारे भारतीय लोक फार लकी आहोत. हवे तेंव्हा देवाचे दर्शन घेऊ शकतो. म्हणजे आज मंगळवार नाही म्हणून गणपतीचे दर्शन मिळणार नाही असे कोणतेही मंदिर सांगत नाही. उलट "गर्दी कमी असेल" म्हणून आपणच सुटकेचा निश्वास टाकतो. आपली हि दैवते मंदिराच्या चार भिंतींमध्ये permanently स्थायिक आहेत. तिथून हलण्याची त्यांना मुभा नाही. त्यामुळे मनात येईल तेव्हा आपण त्यांना भेट देऊ शकतो.

पण ती सोय "वादी"च्या बाबतीत नाही. आज मला वेळ आहे किंवा माझा मूड आहे म्हणून मी एखादी वादी पहायला गेले तर तिथे गारगोटे आणि त्याखाली लपलेले विंचू याखेरीज काहीही दिसणार नाही. ते दृश्य इतके ओसाड असेल कि तिथे पाण्याचा अंशही कोणाला सापडणार नाही. "मी उपास-तापास करेन, २१ नारळ चढवेन, पण माझी इच्छा पूर्ण कर, मला

दर्शन दे" असे blackmailing ही करण्याची सोय इथे नाही. त्यामुळेच ह्या वादी चे दर्शन घडणे म्हणजे देवदर्शनापेक्षाही अधिक कठीण आहे.

पण एकदा का ह्या वादीचे दर्शन घडले ना कि निसर्गाच्या दैवी शक्तीची अनुभूती येते.

क्षणार्धात होत्याचे नव्हते पेक्षा नव्हत्याचे होते करणे म्हणजे काय हे ह्या वादीकडे बघून कळते. दररोजची पायाखालची वाट अचानक गायब होते. आजूबाजूची शांतता भंग करणारा पाण्याचा खळखळाट फक्त ऐकूच येत नाही तर जाणवूही  लागतो. डोंगराच्या कड्याकपारीतून बेभान वाहणारे पाणी दगडमाती सहित एक प्रकारची स्फूर्ती, उमेद, उत्साहपण घेऊन येते. रखरखीत जमिनीवर पांघरूण चढवले जाते. आणि हे सगळे काही तासांच्या तूफानी पावसामुळे घडते.



आपण भारतीयांना ह्याचे फारसे अप्रूप वाटण्याची गरज नाही. एखादा मुंबईकर जर "पावसाळ्यात आमच्याकडे कुर्ल्याला रेल्वेच्या दोन tracks च्या मध्ये सुद्धा वादी येते" असे म्हणून पुढे गेला तरी नवल वाटणार नाही.

पण ह्या देशात गेले काही महिने राहिल्यानंतर, इथले लोक, परिसर, जीवनमान, संस्कृती समजून घेतल्यानंतर आणि थोड्याफार प्रमाणावर अन्गीकारल्यानंतर आज मलाही "वादी आली, वादी आली" म्हणून नाचावसे वाटले ह्यातही फारसे नवल वाटण्याचे कारण नाही.

गेला आठवडाभर इथे उन-पावसाचा खेळ सुरु आहे. ढगांनी सूर्याला झळकायला मज्जाव केला आहे. बऱ्याच दिवसांनी तापमान पुन्हा एकदा teenager झाले आहे. आणि तासा दोन तासांनी वर्षा आपली हजेरी लावून जात आहे. काल रात्री तर वीज-पावसाचे इतके कडाक्याचे (शब्दशः कडाक्याचे) भांडण झाले कि आज सकाळी "अरे उठ. बाहर वादी आयी है" ह्या शब्दांनी मला जाग आली. पण नशिबाने निसर्गाने ह्या सगळयातून काढता पाय घेतला आहे.

ओमानमध्ये दक्षिणेकडील "सलाला" हा परिसर वगळता इतर कुठल्याही भागात पाउस पडत नाही. अहो तशी पद्धतच नाही इथे. पण सद्ध्या global warming च्या डोक्यात वारे शिरल्याने वर्षातून ५/६ वेळा इथे पाउस पडतो. पण त्यामुळे पाण्याचा निचरा नीट होत नाही. म्हणजे  ओमानमधली शहरे, गावे वसवताना पाण्याचा निचरा हा विषय कोणाच्याच डोक्यात नव्हता किंवा असला तरी त्याला इतके महत्व नव्हते. त्यामुळे इथल्या लोकांना आणि परिसराला बेताचाच पाउस झेपतो.

डोळयासमोर दिसणारी वादी कधी रौद्र रूप धारण करील आणि कधी आपल्यालाही स्वतःच्या पोटात सामावून घेईल सांगता येत नाही. ओमानमध्ये अनेक लोकांचा, विशेषतः पर्यटकांचा वादीत अडकून मृत्यू झाल्याच्या वार्ता देखील आहेत. त्यामुळे इथे पावसाने "रिम झिम" वरून जरा कुठे "धो धो" असा स्वर उंचावला कि बऱ्यापैकी भीती पसरते. Alert warnings दिल्या जातात आणि लोकं घराकडे धूम ठोकतात.



पण आजची वादी चांगली होती. तिच्या अंगात जोश होता पण मस्ती नव्हती. सरळ मार्गाने ती आपल्या destination च्या दिशेने वाहत होती. तिचे मातकट पाणी किनाऱ्यावर बसलेल्या आमच्या सारख्या अनेकांना आनंद देत होते.

पण तिच्या चालीत एक लगबग होती. Destination वर पोहोचायच्या आत आटून जाण्याची भीती होती. जणू आपल्या मोजक्या आयुष्याची तिला जाण होती. तिला स्वतःचा अंत  दिसत होता पण हार मानायची तयारी नव्हती. It felt like a race against time and destiny.....

माणसांच्या गजबजाटापासून दूर निसर्गाच्या सानिध्यात गेले ना की असे काहीसे होते. आजूबाजूचे दगड मातीपण कहाण्या सांगू लागतात. त्यांच्या सोबतीने थोडे अबोल क्षण घालवले की मग मनातले विचार असे बोलायला लागतात.

निळाशार समुद्र, उंच डोंगररांगा, अथांग पसरलेले वाळवंट किंवा एखादी छोटीशी वादी- आपल्याला आपली जागा दाखवून द्यायला पुरेसे असतात. एकदम philosophical वगैरे करून टाकतात. त्यांच्याकडे एकटक बघावसे वाटते. पण बघत आपण शून्यातच असतो. अनेक विचार मनात दाटी करतात पण नेमके काय वाटते ते सांगता येत नाही. हजार शब्दांपेक्षा काही काळाची शांतता हवीहवीशी वाटते. किंवा आपण आपोआप शांत होऊन जातो. ती वेळ, तो क्षण कोणीतरी कैद करावा आणि घड्याळाचे काटे कधीही पुढे सरकूच नयेत अशी इच्छा होते.

पण आज दिवसभर पाउस नाही पडला. एव्हाना ती वादी आटली असेल. शेवटी तिचे अस्तित्व त्याच्यावरच अवलंबून होते ना. उद्या सकाळी तळपत्या सूर्यप्रकाशात ते अनाथ झालेले काळे पांढरे गारगोटे पुन्हा चकाकत असतील. आज गायब झालेल्या रस्त्यांवर उद्या वेगवान गाड्या धावत असतील. Teenager तापमानाने direct तिशीत पदार्पण केले असेल आणि पुन्हा एकदा सगळे "जैसे थे" वर येऊन ठेपेल.

पण वादी च्या थंडगार पाण्याचा पायांना झालेला स्पर्श ह्या दिवसाची आठवण मनात नक्कीच ताजी ठेवेल.... at least पुढचा पाउस पडेपर्यंत....

# उत्तर

रंजन कंधारकर

सिडको, औरंगाबाद

ranjan.kandharkar@gmail.com

सखे,

माझं लग्न तसं लवकरच झालं. कॉलेज लाईफ फारच थोडं वाट्याला आलं. मात्र थोडे असले तरी ते दिवस सोन्याचे होते. नुसतेच सोन्याचे नव्हे तर त्याला केवड्याचा सुगंध होता. जो आजही मनात दरवळत असतो. त्या काळात स्टेज ची खूप आवड होती. रंगमंचाची तीव्र ओढ होती. व्यासपीठही खूप गाजवलं. अनेक अंगांनी. वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद, भाषणं, एकपात्री प्रयोग कुठला म्हणून अंग सोडलं नाही. पण या सगळयांमध्ये अभिनय सगळयात जवळचा, सगळयात आवडीचा. सगळा जीब या अभिनयात होता म्हणा ना!

एकेका कलाकृतीसाठी घेतलेली ती प्रचंड मेहनत, ते पाठांतर.... त्या तालमी.. त्यासाठी केलेली रात्रीची जागरणं.. या निमित्ताने झालेली अनेकांशी मैत्री.. ते एकमेकांवर जीव टाकणं एकमेकांच्या आवडी आवर्जून पुरवणं... वेळी अवेळी केलेली डब्ब्यातली अपुरी पण खूप खूप सुख देणारी जेवणं. सगळंच कसं जीवाच्या आतलं होतं

... पण लवकरच लग्न झालं आणि स्टेज करायला बंदी आली. दडपण घरच्यांचं होतं, त्याहून अधिक समाजाचं होतं. त्याहीपेक्षा परिस्थिती चं होतं. जीव खूप तडफडला. पण परिस्थितीशी जुळवून घ्यावंच लागलं. तडजोड करावीच लागली. आणि मग ठरवलं आपलं घर, आपला संसार हीच आपली रंगभूमी. सुखी, आनंदी, परिपूर्ण स्त्रीचा अभिनय हाच आपला जीव. या रंगभूमीवरच



आपण आपली अभिनयाची भूक भागवून घ्यायची. गतकाळातल्या आठवणींची शिदोरी पुरवून उरवायची, पुढच्या प्रवासा साठी. गरजेनुसार रंगभूमीवरची पात्रं वाढली, नाईट वाढली, सोयी वाढल्या. पुरस्कारही मिळाले आणि बघता बघता अभिनयाला धार चढली. तो इतका कसलेला, मुरलेला झाला की, बघणाऱ्यांना हा अभिनय आहे, हे कधी लक्षातच नाही आले. इतकंच नाही तर काही काळाने मी सुद्धा विसरले की, हा आपला अभिनय आहे. मी स्वतःला खरोखरच सुखी, समृद्ध, परिपूर्ण समजायला लागले. सुखी स्त्रीची साडी हवी असल्यास माझ्या घराचा पत्ता देण्यात येऊ लागला.

आज तिसरा अंक सुरू आहे, अंक सुरू व्हायच्या आधी मेकअप रूम मध्ये भेटायला "तो" आला. तो ही असाच पिडलेला. हवं असलेलंच नेमकं न मिळालेला. परंतू सुखी माणसाचा अभिनय मात्र त्याने नाकारलेला. स्वसामर्थ्यावर खऱ्याखुऱ्या सुखाच्या शोधात  असलेला. मी करत असलेला अभिनय त्याने तात्काळ ओळखला. माझ्या अवाजवी हसऱ्या चेहऱ्या आड दडलेली करुण नजर त्याने अचूक टिपली, आणि माझ्यासमोर एक प्रश्नचिन्ह उभे केले – असं का? मी भानावर आले. आपण खरोखर सुखी नसून तो केवळ आपला अभिनय आहे हे पुन्हा एकदा नव्यानं आठवावं इतकं त्यानी जीव लावला. आणि सारं चित्रच पालटलं. आपला इतका उत्कट अभिनय सुद्धा लक्षात यावा इतका तो आपल्यात गुंतलाय हे जाणवले. आणि क्षणभर जीव खरंच सुखावून गेला. तो खूप खूप जवळचा वाटायला लागला.



" चल माझ्या बरोबर, मी तुला खरंच सुखात ठेवीन. अशी अभिनय करायची गरज पडणार नाही." त्याचा हट्ट!

आपली भेट खूप खूप उशीरा झाली रे, मी येऊ शकणार नाही  तुझ्याबरोबर. उत्कट अभिनयाचं बक्षिस म्हणून, नाईट म्हणून ज्या बिरुदावल्या मला मिळाल्यात त्या मला तुझ्याबरोबर येऊ देणार नाहीत. समंजस पत्नी, सालस सून, कर्तव्यनिष्ठ आई हे पुरस्कार माझे पाय मागे खेचतील. मी आता फक्त "मी" राहीलेच कुठे आहे? ह्या पुरस्कारांसाठी केलेला अभिनय आता माझ्या हाडात मुरलाय. कुठला ना कुठला अभिनय करायचं एक जबरदस्त व्यसन जडलंय मला. तो

केल्याशिवाय मी जगूच शकणार नाही. हट्टाने मला बरोबर  नेलंस, खरंच सुखात ठेवलंस तरी माझं व्यसन सुटणार नाही. केवळ एक चॅलेंज म्हणून मला, मी दुःखात असल्याचा अभिनय करावासा वाटेल. मी तो करेन सुद्धा! अगदी उत्कृष्ट. मग हे असं का? हा प्रश्न पुन्हा तुला सतवायला लागेल.  आणि हा प्रश्न तुला फक्त दुःखच देईल. तेव्हा नकोच. माझं घर, माझा संसार हीच माझी रंगभूमी. आणि इतक्या वर्षाचा सोबती असलेला अभिनय हाच माझा जीव.

“अभिनयात जीव आहे म्हणतेस. अभिनय तर पाहिला. जीव कुठंय? दाखवतेस?” त्याचा प्रश्न.

‘हो’ माझं उत्तर. हा घे. बघ. मी वेड्यासारखा त्याच्या तळहातावर माझा जीव टेकवला. आणि मी मिळाले नाही म्हणून तो, खुळ्यागत माझा जीवच घेऊन गेला.



माहीत नाही माझ्या जीवाचं त्यानं केलं. जपून ठेऊन स्वतःच्या जीवात त्याला अडकवलं की, जाताजाताच कुठे कचऱ्यात त्याला फेकून दिलं.

मी मात्र जीवाशिवायच जगतीये. अभिनयात जीव होता म्हणून त्याच्याशिवाय आता अभिनय सुद्धा कुठे कुठे उघडा पडायला लागलाय. जाणवतोय. समजतंय. हे थांबवायला हवं. लिंपायला हवं. शिवायला हवं. पण त्यासाठी माझा जीव तर परत यायला हवा.

सखे,

काल तू मला, माझ्या सारखं मागे वळून बघण्याबद्दल विचारत होतीस. काल मी तुला काहीच बोलले नाही आज उत्तर देते. मी ‘त्याला’ शोधत होते. माझी भिरभिरती नजर सर्वत्र त्याचाच शोध घेत होती. मला खात्री आहे, तो ही माझ्यासारखाच अभिनयाचा वेडा. मला इथेच रंगभूमी जवळच कुठेतरी भेटेल. मग मी त्याच्याकडून माझा जीव मागून घेईन. तो परत माझ्या अभिनयात ओतेन, आणि मग बघता बघता पुन्हा एकदा सुरू होईल... एक नाटक... सुखी

संसाराचं.... सकस, सहजसुंदर अभिनयाचं. पुन्हा एकदा माझा पत्ता देण्यात येऊ लागेल. सुखी स्त्रीच्या साडीसाठी.

सखे

तू मात्र फसू नकोस. माझ्या अभिनयाला दाद तर मुळीच देऊ नकोस. देता आले तर दोन अश्रू दे खरेखुरे. माझ्यासाठी.... फक्त माझ्यासाठी

# सदा माजगावकर

प्रत्येकाला आपल्या आयुष्यात अशी काही माणसं भेटतात की त्या माणसांची त्यांच्याहून अधिक हूरहूर आपल्याला असते. 'या माणसांच कसं होईल' हा विचार आपल्या मनात रेंगाळत राहतो पण त्या माणसाच्या चेह-यावर त्या चिंतेची साधी छटा सुद्धा कधी उमटलेली दिसत नाही. अशी माणसं आपल्या नशीबात हेच आहे म्हणून जगत असतात. ते कधी ध्येयांची गणितं मांडत नाहीत, आणि आलं गेल्याचा हिशोबही ठेवत नाहीत आलेला दिवस ढकलायचा आणि ढकलेला दिवस मजुरीच्या कार्डात भरला म्हणून मोजायचा. एवढंच जगणं, बाकी इतर कोणत्याही गोष्टी आपल्या भाग्यात नाही हा मनाशी केलेला पक्का करार!


सुधीर मुळिक

मुंबई

sudhirkavyalay@gmail.com


असाच एक इसम सदा माजगावकर. व्यवसायाने ईलेक्ट्रीशियन. वसईत कूलर मशीन बनवणा-या कंपनीत वायरींग करणारा वायरमन. मीही त्याच फ़ील्ड मधला असलो तरी पहिली काही वर्षे दुसरीच कामं केली, शेवटी कशात राम नाही म्हणून, कॉलेजात वीस टक्के हजेरी असूनही मिळवलेल्या पदवीला फ़ुकट का घालवा या विचाराने त्याच कंपनीत रूजू झालो. पहिल्याच दिवशी तिथल्या सुपरवाईजरने माझा चेहरा बघून की कुणास ठाऊक का म्हणून मलाही याच सदा बरोबर कामाला जुंपला कदाचित दोन सारखेच बैल एकत्र चांगलं काम करतात असा त्याचा विश्वास असावा. मी प्रथम सदाला पाहिल तेव्हा दुस-या दिवशी काम सोडून द्यायचं हे मनात पक्कं केल होत. सुपरवाईजर ने दिलेल काम मी बरोबर करतोय का? किंवा चुकलं तरी दुर्लक्ष करायचं हे या सदाने ठरवून ठेवल असावं असा माझा समज झाला. शेवटी जेवण आटोपल्यावर कळलं की याला सकाळीच त्या सुपरवाईजर कडून तडी पडली होती. त्यामुळे याचा चेहरा जळालेल्या वेल्डींगसारखा झाला होता. अखेर

दिवस संपेपर्यंत माझं नाव आणि गाव ऐकून त्याचा चेहरा थोडा का होईना पण खुलला. आम्ही दोघही कोकणातले कळल्यावर आम्हा दोघांनाही तितकाच आनंद झाला शेवटी उद्या न येण्याचा विचार मी मनातून काढून टाकला. त्या एका दिवसात पूर्ण कंपनिचा इतिहास, भूगोल आणि आमच्या डिपार्टमेंन्ट मधल्या कामगाराचं विज्ञान त्याने मला समजवून दिलं. आणि ते देखील मालवणी भाषेत! घरी जाताना वसई स्टेशन बाहेर एसटी मध्ये कसं चढायच याचे धडे घेउन मी घरी परतलो. कारण सकाळी याच कारणामुळे मी पहिल्या दिवशी चक्क एक तास उशीरा पोहचलो होतो. दुस-या दिवशी मला दिलेले निर्देश पाळत मी एसटी पकडली. बघतो तर सदा ने माझ्यासाठी सिट आधीच आडवून ठेवलेली! सदा माझ्या सोबत असला तरी माझ्या आधी बस मध्ये कसा चढायचा हे मला पहिल्या दोन तीन दिवसात पडलेलं सर्वात मोठ कोड होत. नंतर कळलं हा अपघात कालीन खिडकीचा वापर करतो तसं करणारे महाभाग बरेच होते. हळूहळू मीही त्या चोर वाटेचा फ़ायदा घेऊ लागलो. सदा कडून मला खूप धडे मिळाले त्यातला पहिला धडा म्हणजे ट्रेन आणी बस मध्ये जर कोणाला आपला धक्का लागला आणि समोरच्या माणसाने प्रश्न केला तर त्याला उत्तर कसं द्यायचं. एकदा एका बलाढ्य देहाच्या पायावर माझा पाय पडला तो गरजला मी म्हटल "माफ़ करा" तरी त्यांचं मन भरेना "काय रे दिसत नाही का? जरा बघून चाल" मी काही बोलण्याआधी सदा त्याला म्हणाला “अहो तुमच्या पायावर पाय ठेवायला त्याला मजा येते, त्याला हौस आहे पायावर पाय ठेवायची” सगळया बस मध्ये हशा पिकला तो माणूस लगेच शांत झाला हेच उत्तर देउन त्याने भल्या भल्यांना गप्प केल होतं. आणि हे कमी होतं म्हणून की काय म्हणे शौचालयात कोणी ‘किती वेळ लावता हो’ असा प्रश्न केला तरी 'खूप मजा येते हो आत' हेच उत्तर द्यायचं. खूप मजा येते या एका वाक्याने सदा सगळयांना गप्प करायचा. बाकी दुसरा कोणताही प्रकार त्याला जमला नसता...

साधारण वय वर्ष ३२. अगदी सडपातळ देह, काळा वर्ण, खोल गेलेले डोळे, ओठांना स्पर्श करणाऱ्या मिशा, आणि त्या मिशांना स्पर्श करणारे नाकातले केस, लांबलचक नाक, डोक्यावर केस होते पण त्या केसांना नेमकं वळण कोणतं ते कळणं अवघड कधी कोणत्या दिशेला असतील सांगणं कठीण, अंगापेक्षा दुप्पट मापाचे शर्ट आणी पॅंट घासुन घासुन रंग उडालेली. त्या कपड्यांएवढं जर सदाला घासलं असतं तर काळयाचा गोरा नाही पण सावळा तरी नक्की झाला असता. पॅंट कमरेतून खाली पडू नये म्हणून करकच्च आवळलेला बेल्ट, पायात आतला निळा रंग दिसेपर्यंत झरलेली स्लिपर, गळयात लाल धागा त्यात साईबाबांचा फ़ोटो आणि खाद्यांवर

सगळया झीप तुटलेली बॅग. पन्नास किलो वजन भरेल तेही त्या अंगापेक्षा दुप्पट कपड्यांमुळे त्याचे कपडे शिवणारा टेलर हा बहुतेक मारवाडी असावा उरलेलं कापड फ़ेकून द्यावं लागतं म्हणून तो असे कपडे शिवत असेल असा त्यावेळी माझा समज झालेला. त्यावेळी माझं वय २२ वर्ष असावं. आमच्या वयात १० वर्षाचा फ़रक असला तरी असा हा निराळाच मनुष्य माझ्या आयुष्यात आला आणि कधी माझा मित्र झाला ते कळलंच नाही.

सदा बरोबर अजूनही ब-याच मित्रांचा योग आला. काही यूपी वाले, काही बंगाली, एक दापोलिचा मामा. त्या व्यक्तिला पूर्ण कंपनीत मामा याच नावाने हाक मारायचे पण त्या नावात मामा हे नातं नव्हतं. मामा ही त्याची उडवलेली खिल्ली असूनही त्या मामाने त्याचा कधीच विरोध केला नाही आपलं अख्खं बिऱ्हाड गावी ठेवून हा माणूस वयाच्या ४५ वर्षापर्यंत नातेवाईंकाकडेच राहत आला होता. त्यात त्याचा काही दोष नव्हता. त्या कंपनीत वर्षाला होणार ईन्क्रीमेंट म्हणजे दिवसाला ७ रू एवढीच झालीच तर एखाद्या ईंजिनियरची १० रू. १० रूपयांवर झालेली एकही पगार वाढ तिथे २० वर्ष काम करणा-या अकौंटंट ला आठवत नाही असं त्याचं उत्तर. हां बोनस मात्र मिळायचा. माझ्या आयुष्यात धरलेल्या आणि सोडलेल्या कामांमध्ये बोनस हा योग आलाच नाही. कारण मी जेव्हां काम धरायचो त्या तारखेपासून दिवाळीला वर्ष पूर्ण झालं नाही म्हणून बोनस नाही आणि दुसरी दिवाळी येईपर्यंत मी तिथे नसे. सदाचा बोनस झाला आणि संपला सुद्धा. यावेळी सदाने नवीन बॅग घेतली. त्याची ती जुनी बॅग बघुन मला बॅग या प्रकाराचा वीट आला होता. पण नवीन बॅग बघून मलाही आनंद झाला. मी म्हणालो “अजुन काय घेतलं रे?” “काय नाय रे झिलग्याक ती चामड्याची पॅट घेतलंय” चामड्याची पॅंट हा प्रकार मला नीट कळाला नाही हे पाहून लगेच म्हणाला “जीन्स रे जीन्स पण आउशीक रे खाव व्हरान त्या दुकानदारानं मामा केल्यान माका मी सांगलय झीलग्याची दि त्या मायझयान बाईल माणसांची दिल्यान” हा लेडीज जिन्स घेऊन आला होता आणि त्याच्या मुलाने ती लेडीज जिन्स घालून दोन दिवसभर मिरवल्या नंतर हा प्रकार त्याच्या लक्षात आला होता. आणि लेडीज किंवा जेन्ट्स जीन्स मलाही अजून ओळखायला येत नाही कदाचित माझ्या जीन्स न घालण्याचं हेही एक कारण असावं. माझ्या ओळखीच्या एका मुलीने तर या प्रकारात कमालच केलेली. तिला थ्री फ़ोर्थ जिन्स घ्यायची होती आणि दुकानदारा कडे या मुलीने अगदी ओरडून वन फ़ोर्थ जीन्स दाखवा अशी मागणी केली होती. असतात असे महाभाग! सदाने मात्र आपल्या मुलाला तीच जिन्स वापरायची बजावून हा विषय तिथेच संपवला होता. एरवी सदा

शांत असायचा. त्याचं जगाशी फ़ारसं नातं नाही असंच वागायचा घर, काम आणि तंबाखू एवढंच त्याचं जगणं. हजेरी कार्डावर दिवस आणि ओव्हरटाईम चे तास दर दिवशी मोजायचा. संध्याकाळचा माझा क्लास असल्यामुळे मी ओव्हरटाईम साठी थांबायचो नाही. सदा नेहमी आळश्यासारखा काम करायचा. हात चालायचाच नाही त्याचा. अवघ्या सहा महीन्यातच बऱ्याच कामाची जबाबदारी माझ्यावरच येऊ लागली. मला बढती मिळाली हे बघुन सदानेही माझ्यासारखं जोमाने काम केलं. त्या महिन्यातला पगार जेव्हा आला, सदाच्या चेह-यावर मला प्रश्नचिन्ह दिसलं. मी विचारलं, "काय रे काय झालं?" सदा शांतपणे म्हणाला "मी काम सोडतय". मी दचकलो. म्हणालो, "असं करू नकोस तू सोडलंस तर मी पण सोडेन". तो म्हणला "तू सोडत असशीत तर मी रवंतय". मी विचारात पडलो. दुस-या क्षणाला म्हणाला, "मेल्या तू धावलंय आणि गेल्या महीन्यात शेवटी ओव्हरटाईम बंद झालो, आता यात घराच्या कर्जाचो हप्तो भरू की घरात सामान भरू?" ७ दिवसांच्या ओव्हरटाईमने महिन्याभराची गणितं चुकतात हे कळून आलं. मला त्या दिवसापासून माझी पुन्हां कोणतीच बढती झाली नाही. सगळयाच कामगारांचे सावकाश चालणारे हात माझ्या धावणा-या हातांना थोपवू लागले आणि मलाही ते मान्य झालं.

सदा आयुष्य जगायचा ते विरार ला ४० हजारात घेतलेल्या ८ बाय ८ च्या घराचे कर्ज फ़ेडण्यासाठी. जगायचा की मरमर मरायचा या प्रश्नाचं उत्तर माझ्याकडे नाही. त्याचे ते शरीरापेक्षा दुप्पट असणारे कपडे शिवणारा टेलर घाटकोपरचा होता कारण ते कपडे सदाचे नव्हतेच कधी. घाटकोपरला राहणा-या मोठ्या भावाचे खराब कपडे तो वापरायचा. आपला डबा हळू खाण्यामागे त्यात आणलेल्या तीन चपात्या कोणाला कळू नये हा एकच उद्देश असायचा. दिवाळीत आपलं दारीद्र्य कोणी पाहू नये म्हणून त्याने घरी न नेता सगळयांना जीवदानीचं दर्शन घडवल होतं. आज ७ वर्ष उलटून गेली सदाला भेटलो नाही. तो कुठे आहे कसा आहे मला ठाऊक नाही. आजही मी एसटी पाहिली की मागच्या खिडकीतून चढणाऱ्या सदाला शोधतो. कदाचित आजही तो ७ रू होणाऱ्या ईन्क्रिमेंट वर तिथेच काम करत असेलही..

मी नेहमी त्या मित्रासाठी सकाळी ७ वाजता उठून वसईला जाण्याचा विचार करत राहतो पण सुर्योदय आणि माझा मित्र दोघेही हल्ली माझ्या नशीबात नाहीत. कदाचित अशा मित्रांसाठी

आपल्याला वेळ मिळतोच असं नाही. कारण प्रत्येकाला हजेरी कार्डाहून मोठा मित्र नसतो हे नक्की ...

# एक मुक्त जीव

मनिषा नाईक(माऊ)

माडांच्या गर्दीत लपलेलं माझं छोटसं गाव... टुमदार कौलारू घरं आणि घराभोवती नारळ-



पोफळीच्या वाड्या... छोटे छोटे नागमोडी धुळीने माखलेले रस्ते थेट समुद्रावर जाऊनच थांबतात....!

गावात नवीन कोणी आलं तर पत्ता शोधण्याची जास्त तसदी घ्यावी लागत नाही. वेशीजवळ एस.टी थांबते, तिथेच जवळच्या पारावर एक तरुण पोरांचा घोळका कायम बसलेला असतो, पूर्ण गावाची सूची आराखडा त्यांना तोंडपाठ आहे. कोणाच्या घरी कुठल्या गावातली पोरगी दिली इथपासून कुठल्या पोरीचं कुठल्या पोराशी मेतकुट आहे इथपर्यंतच्या सगळया बातम्या या चांडाळ चौकडीला माहित असतात. आणि एक बरं का, आमच्या कोकणात एक वेळ रेशनचं दुकान शोधणं कठीण आहे पण दारूचं दुकान मात्र झटकन सापडतं. लहानपणी सकाळी सकाळी इतके लोक कुठं जातात प्रश्न पडायचा. पण हल्ली उत्तर सापडलंय त्या प्रश्नाचे.

मनिषा नाईक (माऊ)
पुणे
nmani15@gmail.com

आजीचे घर बाजाराच्या रस्त्यावर आहे. सकाळी ७-३० नंतर बरेचसे काका - मामा ( गावात सगळे एकतर काका असतात नाहीतर मामा. फारच लहान असतील तर दादा नाहीतर आण्णा ) लोक सकाळी सकाळी बाजाराच्या रस्त्याने जायचे. जाताना आजीला हाक मारल्याशिवाय पुढे जायचे नाहीत पण

येताना मात्र सगळे डुलत डुलत यायचे. ते असे का करतात याची फार गंमत वाटायची आम्हां पोरा-सोरांना. त्या वेळी ते काहीच कळले नाही.

या घोळक्यात माझ्या आवडते काका म्हणजे "अंत्याकाका "! तसं त्याचं नाव "अनंता माळी". पण गावातले सगळे त्याला "अंत्या" च म्हणायचे. नावांचा अपभ्रंश करण्याची कला आमच्या गावातल्या लोकांकडून शिकावी. महादेवाचा "म्हाद्या", केशवाचा "केश्या", पांडुरंगाचा "पंड्या", रघुनाथाचा "रघ्या", रमेशचा "रम्या", प्रसादचा "पश्या" अशी सगळी बारशी होतात. मुलींच्या नावाचेही तसेच. शालिनीचे "शाले", सुमतीचे "सुमे", कल्पनाचे "कल्पे", संगीताचे "संगे", अशी सगळ्या नावांची ज्याला वाटेल तशी वाट लावायची. तसाच हा "अंत्या-काका". आवडता काका यासाठी की तो रोज सकाळी नित्य नियमाने बाजाराच्या रस्त्याकडे जाताना दिसायचा आणि जाताना आजीला "आत्या आटोपलं काय गो" अशी हाक मारून निघून जायचा. मग चांगला तासाभराने डुलत डुलत येताना दिसायचा. आजीच्या घरासमोर थांबायचा खूप काहीतरी बडबड करीत असायचा. आम्हा मुलांना चॉकलेट द्यायचा. फार मायेनं बोलायचा. म्हणून तो आवडता काका. तसा तो जवळचा दूरचा कोणी नातेवाईक नव्हता पण तरीही माया करायचा. डुलत डुलत अडखळत चालायचा हातात काळी पिशवी असायची. ही काळी प्लास्टिक पिशवी फार बदनाम बरं का! कारण ही ज्याचा हातात तो एक तर मच्छी घेवून आलेला असतो अथवा बाटली. अंत्या-काकाच्या हातात हि काळी पिशवी रोज असायची. आजी सांगायची "एकही दिवस याचा मच्छी शिवाय जात नाही. त्याला बाजारातलीच मच्छी आवडते". तशी आमच्या गावात ठरलेल्या पाड्यात ठरलेली कोळीण ठरलेल्या वेळी रोज "बाजार हवाय काय" हाकाटी करीत येते. गावातल्या पहिल्या घरापासून शेवटच्या घरापर्यंत सगळेच तिच्याकडून मच्छी घेतात. रोज तिच्या टोपलीत जे असेल तेच प्रत्येकाच्या घरात शिजते. पण अंत्या-काकाला तिची मच्छी नाही पटत.



गेले कित्येक वर्ष तो सकाळी बाजारात जाणार आणि मच्छी घेवून येणार. ते ही डुलत डुलत. हे ठरलेलं! असा एकही दिवस नाही ज्या दिवशी ‘अंत्या माळ्याने’ मच्छी खाल्ली नाही असे लोक हसत हसत सांगतात. हा देवाचा परम भक्त. रोज मंदिरात जातो. संध्याकाळी दिवा बत्ती

करतो. गावातल्या भजनांना, पूजेला, उत्सव-समारंभाला आवर्जून हजर असतो आणि तयारी करायला सगळयात पुढे असतो. आता तयारी करता करता मध्येच बाजाराच्या दिशेने जायचा ते वेगळं सांगायला नको. एक अशी गोष्ट नाही जी या माणसाला येत नाही. कुणाचे ही लग्न असू दे जेवणाच्या पंगतीतून असा काही रुबाबात फिरत असतो कि जसा काही यजमान हाच आहे. नाहीतर याच्या कृपेनेच जेवणावळ घातली आहे. मुलगी सासरी जाताना मात्र याचे डोळे पाणावतात. मग ती शिक्षकाची असो, पाटलाची नाहीतर खालच्या आळीतील शिंप्याची असो! सगळयांच्या वरातीला हा शेवट पर्यंत थांबतो. वरात वेशीपर्यंत पोहचवून मगच गावात परत येतो. त्या दरम्यान सदऱ्याच्या आतल्या खिशातील बाटली काढून घोट घेणे चालूच असायचं. एकदम मनस्वी माणूस. गावातल्या सगळया शुभकार्यात आवर्जून मिरवून घ्यायचा आणि अशुभ कार्यातही सर्वांना धीर द्यायला हजर असायचा. देवावर त्याचा खूप विश्वास. पोथी पुराणे वाचायचा, कीर्तन उत्तम करायचा. पण एकादशी असो वा चतुर्थी रोज मच्छी मात्र हवीच हवी! आजी सांगायची, "हा चतुर्थीचा कडक उपवास दिवसभर करतो...नुसती फळे खातो, खिचडी ही नाही. गणपतीच्या देवळात बराच वेळ अगदी षोडशोपचार पूजा करतो. २ तास घालवून स्वत:च्या हाताने १००१ दुर्वा काढतो. चंद्र उगवे पर्यंत कडकडीत उपवास करतो. आरती करून देवाला नैवेद्य दाखवतो. स्वतः उपवास सोडायला बसतो. पहिले पाच घास वरण भाताचे खातो. नमस्कार करतो आणि मग सरळ मच्छीच्या कालवणाचे पातेले घेवून बसतो, मासळीचे कालवण आणि तळलेल्या तुकड्या यावर मनसोक्त ताव मारतो! दिवसभराची सगळी कसर भरून काढतो."



मी त्याला नेहमी नशेतच पाहिलं पण नशेतही कधी वाईट मात्र वागला नाही. एकदा, शांताक्का ने निरोप दिला "खाडीच्या शिंगाळया आणल्यात घरी कोणाला तरी पाठव घ्यायला" आजीला खाडीची मच्छी खूप आवडायची. शांताक्का नेहमी घरी यायची ती अशी काही चांगली मच्छी असेल तर आजीसाठी आणून ठेवायची. घरीच आणून द्यायची आणि जाताना आजीच्या हातच्या पांढर्या शुभ्र तांदळाच्या भाकरी घेवून जायची. तिला आजीची पातळ पापुद्र्याची भाकरी खूप आवडायची. आणि ती येणार असेल तर आजी हि मुद्दाम जास्त करून ठेवायची. आजीने जायला

सांगितले मग. मी आणि ताई निघालो बाजाराच्या दिशेने. अंत्या काका तिथेच एका दुकाना जवळ बसला होता. ते दुकान कसलं होतं तेव्हा माहित नव्हतं, फक्त आजी सांगायची, "लांबून जात जा तिकडे जायचे नाही. ती जागा चांगल्या माणसांची नाही ".  “आजी अशी का बोलते? अंत्या काका तर तिथे जातो आणि तो तर खूप चांगला आहे". प्रश्न मनात यायचा पण आजीला विचारायचे धाडस नाही व्हायचे. आम्ही मच्छी घेवून येत होतो एका गल्लीच्या टोकावर एक छोटासा नागमोडी रस्ता होता. आम्ही तिथून पुढे येत होतो तर एक काका झिंगत चालले होते. तो रस्ता इतका लहान होता की दोन माणसे एका वेळी जावू शकत नव्हती. ते काका खूप अंग चोरून कोपऱ्यात उभे राहिले आणि आम्हाला तिथून जावू दिलं. इकडे अंत्या काकाची धांदल उडाली. तो धावत मागे आला. पुढे आल्यावर म्हणाला “पोरीनो ठीक आहे ना सगळं? तो माणूस पिलेला होता म्हणून मी तुमच्या सोबतीला आलो”. आज तो प्रसंग आठवला कि हसू येतं. "तो पिलेला होता" असे हा सांगत होता ज्याला स्वतःला उभंही राहता येत नव्हतं.



आमच्या गावात कित्येक गंमतीदार समज आहेत. रात्री ८ नंतर तिवठ्यावर असलेल्या वडा खालून कुणी जात नाही. तिथं भूत रहातं. कुणाला कधी दिसलं नाही. पण गुरवाच्या सुनेला त्यानं एकदा पछाडल होतं म्हणे. तिच्यात इतकी ताकद आली कि ती रागाने कुणाला हि उचलून दूर टाकायची. १० पुरुष हि एकत्र गेले तरी तिला ते आवरू शकत नव्हते. कधी कधी अमावस्या-पौर्णिमेला तिला तळघरात कोंडून ठेवावं लागत असे. ती असलं काही मानत नव्हती, केस मोकळे ठेवून एकदा नकळत त्या वडा खालून रात्रीची आली आणि मग कामातून गेली!

पिराच्या उत्सवाला एक फकीर बाबा आले होते. त्यांनी उतरवलं म्हणतात. ते काहीही असो पण आजीने सांगितलं म्हंटल्यावर आमची मात्र जायची टाप नव्हती.

पण अंत्या-काका मात्र रात्री कधीही वेळी अवेळी वडा खालूनच काय, बंदरावरही जातो. त्याला अजून कुठल्याही भुताने काही केलं नाही.

"तो स्वतःच एक भूत आहे" आजी गंमतीने म्हणायची.

गावात लग्न असलं की आदल्या दिवशी रात्री हळदीचा कार्यक्रम असतो या हळदीच्या दिवशी. बरेच दिवंगत नातेवाईक पाहुणे म्हणून अंगात येतात. मग भक्तीण खेळू लागते. बरेच काही मागणे मागते आणि त्या घरातली मोठी लोक त्या सगळया मागण्या पूर्ण करण्याची आश्वासने देतात. आणि त्या पुऱ्या केल्या कि मग निर्विघ्न कार्य पार पडेल अशी जुनी समजूत आहे! मांडवात भक्तीण खेळू लागली कि अंत्या माळी तिच्या मागे-पुढे करायचा तिला हवे असलेले हळद-कुंकू, कापूर, अबीर भरभर आणून द्यायचा. ती कुठल्या नाक्यावर, पुलावर नारळ द्यायला सांगणार आहे. हे त्याला तोंडपाठ होते. लग्नाच्या घरी गड्या सारखा दिवसभर राबायचा तेही एक पैसा न घेता. २-३ दिवस पाहुणचार करायचा. बस्स! स्वारी खुश! सगळया घरांशी त्याचा घरोबा..!



बाकी इतर दिवस तो लोकांच्या वाडीत जायचा दिवसभर नारळ पाडणे, सुपारी कातरणे, शिपणं करणे असली कामे करायचा. सकाळी एकदा आणि कामावरून सुटल्यावर संध्याकाळी एकदा अशा दोन वाऱ्या बाजाराच्या जरूर करायचा. येताना काळी पिशवी भरून मासळी घेऊन यायचा! खूप साधे होते त्याचे आनंद. कधी दु:खी पहिला नाही त्याला. दारू प्यायचा पण दारू पिऊन कोणाला त्रास मात्र नाही द्यायचा. उलट जो जे बोलेल ते सारे हसून ऐकून घ्यायचा. आम्ही शहरात यायला निघालो की मग एस.टी थांब्यावर पोहोचवायला यायचा. "बाय नीट जा गो. पोहोचल्यावर पत्र धाड" असं डोळयात पाणी आणून सांगायचा .

त्याने स्वतःचे घर कधी केले नाही सगळया गावालाच आपले घर मानले. गावातील प्रत्येक उंबरा त्याचाच होता. हक्काने पडवीत येवून बसायचा. हक्काने जेवण आणि पान तंबाखू मागायचा!

आता काळ फार पुढे सरकला. लहनपण सरलं. अंत्याकाका नाही राहिला. जाताना फार फार आजारी होता म्हणे. खपला तेंव्हा अख्खं गाव पोचवायला गेलं होतं असं ऐकलंय ...!

पण काही केल्या पिंडाला कावळा शिवत नव्हता. पक्या वाण्याने हातभट्टीची वाटीभर आणि थोडासा तंबाखू ठेवला. म्हणे लगेच कावळा शिवला. जीव मुक्त झाला. तसाही तो सदैव "एक मुक्त-जीव"च होता. कधीच कुठल्या बंधनात अडकला नाही. आयुष्य आपल्या त-हेंने जगत राहिला. ना कधी भूतकाळ आठवून रडला. ना कधी भविष्याची फिकीर करीत जीव जाळीत बसला.  राजा सारखा राहिला...!

अजूनही गावी गेलं की सकाळी कधीतरी वाटतं आत्ता समोरच्या गल्लीतून तो येईल आणि हाकाटी घालील "आत्या आटोपलं काय गो"..!

## खोल दो..

प्रवाश्यांनी खचाखच भरलेली ती ट्रेन अमृतसरहून बरोब्बर दुपारी दोन वाजता निघाली आणि आठ तासानंतर मुघलपुरला पोहोचली. आठ तासाच्या त्या रस्त्यात, त्या जणु काही कधी न



संपणाऱ्या प्रवासात किती निष्पाप जीव मारले गेले, कितीतरी जखमी झाले आणि कित्येक परागंदा झाले याची काही गणतीच नव्हती.

सकाळी साधारण दहा वाजायच्या सुमारास छावणीतल्या त्या थंडगार जमीनीवर जेव्हा सिराजुद्दीनने आपले डोळे उघडले, तेव्हा आजुबाजुला ओसंडून वाहणारा तो स्त्री, पुरूष आणि मुला-बाळांचा अवाढव्य समुद्र त्याच्या दृष्टीस पडला. आपली विचार करण्याची, काही समजून घेण्याची क्षमता अजूनच वृद्ध, क्षीण होत असल्याची ती पहिली जाणीव त्याला झाली. कितीतरी वेळ तो शुन्य नजरेने गढूळलेल्या, जणु काही मळभ दाटलं असावं असे वाटणाऱ्या त्या

(मूळ कथा: सदाअत हुसेन मंटो)

अनुवाद: विशाल कुलकर्णी.

पुणे

vkulkarni.omnistar@gmail.com

अथांग आकाशाकडे पाहातच राहीला. खरेतर छावणीत प्रचंड हल्लकल्लोळ माजलेला होता, सगळीकडे रडारड, आपल्या हरवलेल्या, ताटातुट झालेल्या माणसांना शोधण्याची गडबड चालू होती. प्रचंड गोंधळ माजला होता, पण म्हाताऱ्या सिराजुद्दीनच्या जशी काही कानठळीच बसली असावे तसे झाले होते. त्याला काहीच ऐकू येत नव्हते. कुणी त्याला तशा अवस्थेत पाहिले असते तर छातीठोकपणे सांगितले असते की तो शांतपणे झोपला आहे. पण तसं नव्हतं. जणु काही तो आपलं चैतन्य, आपली शुद्धच हरवून बसला होता. जणु काही त्याचं सारं अस्तित्वच कुठेतरी शून्यात अधांतरी लटकलं असावं तसं...

अगदी निरुद्देश्य वृत्तीने त्या गढुळलेल्या आकाशाकडे बघता बघता अचानक सिराजुद्दीनचे डोळे त्या उदास सुर्यावर स्थिरावले. ते तेजस्वी, अंग-अंग जाळणारे सूर्यकिरण त्याच्या अस्तित्वात, त्याच्या गात्रा– गात्रात भिनायला लागले आणि सिराजुद्दीनला जाग आली...

त्या जागृतावस्थेत गेल्या काही तासांमधल्या घटना, ती चित्रे एखाद्या चित्रमालिकेसारखी एका क्षणात त्याच्या निर्जीव नजरेसमोर सरकत गेली. लुटालूट, आगीचे कल्लोळ, प्रचंड पळापळ, ते रक्तरंजित, भयव्याकुळ माणसांच्या गर्दीने भरलेले रेल्वे स्टेशन, बंदुकीच्या गोळया, ती काळरात्र आणि सकीना!

सकीना...

जणु परत आली, तो ताडदिशी उठून दुसऱ्याच क्षणी पसरलेल्या त्या महासागरात त्याने



सिराजुद्दीनची चेतना जिवाच्या आकांताने उभा राहिला आणि आपल्या चहुबाजुला माणसांच्या अवाढव्य स्वतःला झोकून दिले.

सकीनाला शोधण्यासाठी....

जवळजवळ तीन तास. तीन तास तो निर्वासीत छावणीच्या कानाकोपऱ्यात सकीना-सकीना असा आक्रोष करत आपल्या एकुलत्या एक, तरुण लेकीला शोधत होता, पण सकीनाचा काहीही पत्ता लागला नाही. छावणीत सगळीकडेच आकांत माजलेला, प्रचंड गोंधळ उडालेला होता. कुणी आपल्या मुलाला-मुलीला शोधत होते, कोणी आई, कोणी आपली पत्नी शोधत होते. शेवटी थकला भागला सिराजुद्दीन एका कोपऱ्यात टेकला आणि मेंदूवर जोर देऊन आठवण्याचा प्रयत्न करु लागला. नक्की कुठे आणि केव्हा सकीना त्याच्यापासून वेगळी झाली असावी, कुठल्या क्षणी त्याची तिच्यापासून ताटातूट झाली असावी? पण सकीनाचा विचार करायला लागला की त्याच्या स्मृतींचा शोध सकीनाच्या आईच्या त्या विच्छिन्न प्रेतावर येऊन स्थिरावायचा, संगीनीच्या आघाताने जिची सगळी आतडी बाहेर आलेली होती. त्याच्यापुढे जाऊन काही विचार करणे सिराजुद्दीनला शक्य होईना. सकीनाची आई कधीच अल्लाला प्यारी झाली होती त्या दंगलीत. सिराजुद्दीनच्या असहाय्य डोळयांदेखतच तिने तडफडत आपले प्राण सोडले होते. पण सकीना? सकीना कुठे होती? जिच्याबद्दल मरताना तिच्या आईने सिराजुद्दीन्ला कळवळून सांगितले होते , “मला सोडा आणि सकीनाला लवकरात लवकर येथून दूर कुठेतरी घेऊन जा.”



सकीना त्याच्यासोबतच होती. दोघेही हातात हात धरुन, अनवाणी पायाने जिवाच्या आकांताने अज्ञाताच्या दिशेने धावत होते. मध्येच सकीनाची ओढणी गळून पडली, ती उचलण्यासाठी तो थांबायला गेला तेव्हा सकीनाने ओरडून सांगितले, “जाऊदे अब्बाजी, सोडून द्या ती ओढणी” पण सिराजुद्दीनने ओढणी उचलून घेतली होती. हा विचार करतानाच नकळत त्याने आपल्या कोटाच्या फुगलेल्या खिश्याकडे पाहीले आणि खिश्यात हात घालून त्याने, त्यातुन एक कापड बाहेर काढले.

सकीनाची तीच ओढणी होती, पण सकीना...सकीना कुठे होती?

आपल्या शिणावलेल्या मेंदूवर सिराजुद्दीनने खूप जोर देऊन पाहिला, पण तो कुठल्याच निर्णयाप्रत येऊ शकला नाही. त्याला आठवेना, तो सकीनाला नक्की आपल्याबरोबर स्टेशनपर्यंत घेऊन आला होता का? ती त्याच्याबरोबर गाडीत चढली होती का? काहीच आठवत नव्हते. मध्येच रस्त्यात जेव्हा गाडी जबरदस्तीने थांबवली गेली आणि काही हल्लेखोर जबरदस्तीने गाडीने शिरले तेव्हा तो बेशुद्ध झाला होता का की ज्यामुळे त्याच्या बेशुद्धीत ते सकीनाला पळवून घेऊन गेले? सिराजुद्दीनच्या मेंदुत विचारांचा हलकल्लोळ माजला होता. प्रश्न, प्रश्न शेकडो प्रश्न मेंदूत उठत होते, त्याला कुणाच्या तरी सहानुभुतीची गरज होती पण दुर्दैवाने आजुबाजुला इतके दुर्दैवी जीव अडकले होते, त्या प्रत्येकालाचा सहानुभुतीची गरज होती. अश्रूंनीही त्याची साथ सोडली होती. सिराजुद्दीनने रडण्याचा खुप प्रयत्न केला पण डोळ्यातली आसवे जणू त्या काळरात्रीत कुठल्यातरी क्षणी सुकून गेली होती, हरवली होती.



आठवड्याभराने जेव्हा मनाची अवस्था जरा ताळयावर आली तेव्हा सिराजुद्दीन अशा काही लोकांना भेटला जे त्याच्या मदतीसाठी तयार होते. आठ तरुण होते, ज्यांच्या जवळ लाठ्या-काठ्या आणि बंदुकी होत्या. सिराजुद्दीनने त्यांचे लाख लाख आभार मानले आणि त्यांना सकीनाचे वर्णन सांगितले.

“दुधासारखा गोरा रंग आहे माझ्या छोकरीचा आणि ती खुप सुंदर आहे. आपल्या आईवर गेली होती. जवळ जवळ १७ वर्षाची गोड मुलगी. मोठे मोठे टपोरे डोळे, काळे लांब केस, उजव्या गालावर एक मोठा तिळ... माझी एकुलती एक पोर आहे हो ती. माझ्यावर दया करा, तिला शोधून आणा, अल्ला तुम्हाला भरभराट देईल, तुमच्या आयुष्याचे भले करेल.”

त्या रजाकार तरुणांनी अगदी मनापासून म्हातार्‍या सिराजुद्दीनला विश्वास देण्याचा प्रयत्न केला की जर त्याची मुलगी जिवंत असेल तर ती थोड्याच दिवसात परत त्याच्यासोबत असेल, ती जबाबदारी आमची...

त्या आठ तरुणांनी मनापासून प्रयत्न केले. अगदी आपल्या प्राणाचा धोका पत्करुन ते अमृतसरला गेले. कित्येक स्त्री-पुरूष आणि मुला-बाळांना त्यांनी प्राण वाचवून सुरक्षीत स्थानावर पोहचवले.

एक दिवस हेच काम करत असताना ते एका ट्रकमधून अमृतसरला जात होते. मध्ये ‘छहररा’ गावापाशी लांबवर पसरलेल्या भकास रस्त्यावर त्यांना एक तरुण मुलगी आढळली. ट्रकचा आवाज ऐकुन दचकलेली ती तरुण मुलगी घाबरुन पळायला लागली. रजाकारांनी गाडी थांबवली आणि ते सगळेच्या सगळे तिच्यामागे धावले. एका शेतात त्यांनी तिला पकडलेच. तिला पकडल्यावर त्यांच्या लक्षात आले ती अतिशय सुंदर होती, उजव्या गालावर एक मोठा तिळ होता. त्यांच्यापैकी एका तरुणाने तिला विश्वास देत विचारले “घाबरु नकोस, तुझे नाव सकीना आहे का?”

मुलगी भीतीने अजूनच लाल झाली, भीतीने तिच्या चेहऱ्याचा रंग अजूनच पिवळा पडला,



काही बोलेचना बिचारी. सुन्नपणे खाली मान घालुन बघत बसली. पण जेव्हा सर्वांनी मिळुन तिला धीर दिला, तेव्हा ती थोडी आश्वस्त झाली. मनातली भीती दूर झाल्यावर तिने मान्य केले की ती सिराजुद्दीनची मुलगी सकीनाच आहे. आठही रजाकार तरुणांनी हर प्रकारे तिचे मन शांत करण्याचा, तिला खुश करण्याचा प्रयत्न केला. तिला खाऊ घातले, दूध प्यायला दिले आणि चुचकारुन तिला ट्रकमध्ये बसवले. एकाने आपला कोट काढून तिला पांघरला कारण ओढणी नसल्याने तिची अवस्था फारच लाजिरवाणी झाली होती. ती अस्वस्थ होत पुन्हा पुन्हा आपली छाती आपल्या हातांनी झाकण्याचा प्रयत्न करत होती.

बरेच दिवस उलटून गेले तरी सिराजुद्दीनला आपल्या सकीनाबद्दल काहीच कळले नव्हते. रोज वेगवेगळया निर्वासितांच्या छावणीत वेड्यासारखे तिला शोधत फिरणे हे त्याचे रोजचे काम झाले होते, पण तरीही त्याला त्याच्या लेकीचा काहीही पत्ता लागला नाही. रात्र-रात्र जागून तो अल्लाकडे त्या रजाकार तरुणांना, ज्यांनी त्याला वचन दिले होते की जर सकीना जिवंत असेल तर ते तिला शोधून काढून त्याच्यापर्यंत पोचवतील, त्या तरुणांना यश देण्यासाठी अल्लाची विनवणी करत असे, दुआ मागत असे.

एक दिवस सिराजुद्दीनने निर्वासितांच्या एका छावणीत अचानक त्या तरुण रजाकारांना पाहीले. ते सगळे एका ट्रकमध्ये बसले होते. सिराजुद्दीन अक्षरशः पळतच त्यांच्याकडे गेली. ट्रक

निघणारच होता की सिराजुद्दीनने त्यांना विचारले, बाळांनो, माझ्या सकीनाचा काही पत्ता लागला का? सगळयांनी एकमुखाने त्याला सांगितले, "काळजी करु नका, लवकरच तिचा पत्ता लागेल आणि ट्रक निघून गेली. सिराजुद्दीनने अजून एकदा अल्लाकडे त्या तरुणांच्या यशासाठी दुआ मागितली तेव्हा कुठे त्यांचा जीव शांत झाला. जणुकाही मनावरचे ओझेच उतरल्यासारखे वाटले त्याला.

संध्याकाळी नजिकच्याच एका निर्वासित छावणीत सिराजुद्दीन उद्विग्न होवुन बसला होता. अचानक आजुबाजुला काहीतरी गडबड झाली. चार माणसे काहीतरी उचलून घेऊन जात होते. त्याने चौकशी केली तेव्हा त्याला कळाले की एक तरुण मुलगी रेल्वे लाईनजवळ बेशुद्ध पडली होती, लोक तिला उचलून घेऊन आले आहेत. सिराजुद्दीन त्यांच्या मागे मागे चालायला लागला. लोकांनी मुलीला रुग्णालयात तेथील कर्मचाऱ्यांच्या हवाली केले आणि ते तिथून निघून गेले.



काही वेळ सिराजुद्दीन तिथेच रुग्णालयाच्या बाहेर अंगणात गाडलेल्या एका लाकडी खांबाला टेकून उभा राहीला आणि थोड्या वेळाने हळूच रुग्णालयात आत शिरला. खोलीत कोणीच नव्हतं. फक्त एक स्ट्रेचर आणि त्या स्ट्रेचरवर पडलेले एक अचेतन शव. सिराजुद्दीन आपली जड झालेली पावले उचलत त्या शवाकडे सरकला. खोलीत अचानक लख्ख प्रकाश झाला. सिराजुद्दीनने त्या शवाच्या पिवळया पडलेल्या चेहऱ्यावरील त्या प्रकाशाच्या तिरीपीत चमकणारा तो तिळ पाहीला आणि तो आनंदाने ओरडलाच...

"सकीना......."

डॉक्टर, ज्यांनी खोलीतला दिवा लावून प्रकाश केला होता, त्याने सिराजुद्दीनला विचारले.. "काय झाले? काय पाहिजे?"

सिराजुद्दीनच्या रुद्ध कंठातून कसेबसे दोन तीन शब्द बाहेर पडले, " मी... हुजुर मी...तिचा बाप आहे हो."

डॉक्टरने शवाची नाडी तपासली आणि खोलीच्या खिडकीकडे बोट करत सिराजुद्दीनला म्हणाले...

“खोल दो...!”

सकीनाच्या शरीरात हळूच एक क्षीण हालचाल झाली. आपल्या निर्जीव हातांनी, तिने आपल्या सलवारची नाडी सोडली आणि तितक्याच निर्जीव अलिप्तपणाने आपली सलवार गुडघ्याच्या खाली सरकवली.

सिराजुद्दीन आनंदाने चित्कारला...

“जिंदा है, मेरी बच्ची जिंदा है.. (?)

# आवराआवरीचा पसारा

श्रीपाद कुलकर्णी

कधी नव्हे ते 'काटा रुते कुणाला' हे गाणं साग्रसंगीत, छबुराव आपल्या अर्धांगिनीपुढे गात आहेत. ही उलटी एन्ट्री कधी नव्हे ती झालेली पहाटेच्या साखरझोपेत. अन् तेवढ्यात ती आरवते, "अहो, झोप आवरा आता."

श्रीपाद कुलकर्णी

बिबेवाडी, पुणे

shripadkster@gmail.com

अर्थातच आजचा रविवारही असा-तसा (वाया) जाऊ शकेल, अशी सुतराम शक्यता उरत नाही.

"आज मेला तो मायाबाजार काढा नं आवरायला. आळस काय मेला जन्माचाच आहे." बायकोचा सात्त्विक स्वर.

"महामाये, या साऱ्या आवराआवरीत तुझ्या तोंडाचाही समावेश करायला विसरू नकोस." असं एखादं दीर्घ वाक्य टाकण्याचा बेत छबुराव मनातल्या मनात आवरता घेतात. कारण त्याच वेळी त्यांच्या डोक्यात आरवणे आणि आवरणे यांच्यापकी अपभ्रष्ट रूप कुठलं, याविषयी गोंधळ उडालेला असतो.

'मायाबाजार' हा 'मायेने जतन करून ठेवलेला बाजार' असा मध्यमपदलोपी समास आहे. आणि हा बाजार इन मिन दोन खोल्यांच्या जंगम संसारातल्या भल्यामोठ्या जुन्या शिसवीच्या कपाटात भरलेला असतो. भिंत चालवणाऱ्या ज्ञानेश्वरांनाही या कपाटाला हात घालण्याचं धाडस होणार नाही, असा रास्त अभिमान छबुरावांना असतो. हो.. कारण आईबाबांकडून मिळालेली तेवढीच काय ती स्थावर मालमत्ता. त्यात उदबत्तीच्या घरापासून कदाचित



लोखंडाच्या चुलीपर्यंत साऱ्या पंचधातुंकित अन् सहस्रनामांकित अशा अनेक पूज्य गोष्टींची रेलचेल असते. छबुरावांच्या नव्या संसारातल्या स्टीलच्या भांडय़ांचा स्वैंपाकघरातील सुळसुळाट त्या भांडय़ांना 'आ' वासून कपाटात बसायला लावतो. आता उदबत्तीच्या घराखालीही झुरळांची अंडी विखुरलेली असतात. तीच गत छबुरावांच्या काळी वापरल्या जाणाऱ्या भरमसाट दुपटय़ांपासून कोटाच्या गुंड्यांपर्यंत साऱ्या जुन्यापुराण्या कपडय़ांची. ते बेटे एकमेकांच्या कॉलरमध्ये एकमेकांच्या बाह्य़ा अडकवून पडलेले असतात. त्यामानाने साडय़ा-चोळया कमी प्रमाणात असतात. त्यावरून त्या काळची बायकांची सांस्कृतिक स्थिती खालावलेली होती असं दिसतं, असं छबुरावांच्या बायकोचं म्हणणं.

आणि छबुरावांच्या मते खरी संस्कृती एका पलंगाखाली वास करत असते. ती म्हणजे मोठमोठे ग्रंथराज. एका मोठय़ा पोत्यात सारे ग्रंथ कोंबून ठेवलेले अन् त्यातूनसुद्धा ब्रह्मांडज्ञान ओसंडायला लागलं म्हणून ते एका मोठय़ा लोखंडी ट्रंकेत साठवून ठेवलेले असत. जेव्हा ती वाळवी लागलेली कोरी करकरीत संस्कृती गोळा करायला आणि रद्दीत घालायला मिसेस छबुराव सांगतात तेव्हा छबुरावांना गलबलून येतं. त्यांचा सात्त्विक संताप त्यांच्या चष्म्याच्या काचा घामट करतो अन् त्यांच्या थरथरत्या ओठांतून शब्द फुटतात, "म्हणजे ही जुनी अमूल्य, अमृततुल्य संस्कृती तुझ्या डोळयांत खुपते तर!" मिसेस आळस देत ओरडतात, "पाठीत खुपते.. पाठीत तो एकनाथी भागवत रात्रभर जागवत असतो." या वाक्याचं विश्लेषण जेव्हा केलं जातं तेव्हा कळतं की, मिसेस छबुरावांच्या शरीरभारामुळे झोळ आलेल्या पलंगावरच्या गादीतूनही पोत्यातल्या ग्रंथराजाचं चिलखत पाठीला खुपत असतं. दुसऱ्या मोठय़ा ट्रंकेचं टोक शेजारच्या छबुरावांच्या झोके घेणाऱ्या पायाला लागून पाय फ्रॅक्चर होण्याची वेळ येऊन गेलेली असते. जुन्या संस्कृतीची ही नवी उग्र स्वरूपं पाहून मिसेस छबुराव ती ब्याद तिथून हलवायला उत्सुक असतात. पण छबुराव आपली ढाल फिरती ठेवण्याचा प्रयत्न करतातच.

"आमच्या जुन्या संस्कृतीचा वारसा त्या कपाटात विराजमान झालेलाही तुम्हाला खपत नाही. जुनं ते सोनं बघण्याची दृष्टी.."

आवंढा गिळण्यासाठी थांबलेल्या छबुरावांचा फायदा मिसेस पटकन उठवतात, "आमचा काही उभ्या जन्माचा दावा नाही बरं त्या सोन्याबरोबर!"

“तर मग कशाला समन्स काढताय?”

“मेलं किती दिवस कवटाळून ठेवणार आहात ती बिनकल्हईची भांडी अन् जुनी पटकुरं? कुणी तरी म्हणून ठेवलंच आहे नं- ‘जुने जाऊ द्या मरणालागुनी..’”

“..अन् नवीन आणा काही शोधुनी.. नाहीतर काय भारताच्या लोकसंख्येप्रमाणे वाढणाऱ्या तुमच्या साडय़ांना गोदरेजचं कपाटही अपुरं पडायला लागलं असेल आणि आमच्या आईने मायेचे तुकडे जोडून शिवलेल्या दुपटय़ांची जागा आपल्या कन्यारत्नाच्या दुपटय़ांनी.. आय् मीन.. मिनी स्कर्टांनी भरून काढायची असेल. वर बोहारणीचा धंदा तेजीला आणून स्टीलच्या भांडय़ांची नव्याने आरास मांडायची आहे वाटतं कपाटात!”

एवढं बोलून छबुराव दम घेतात तोपर्यंत..

“..अन् ती तुमची मोठमोठी पुस्तकं काय जाळायचीत हो? छे! बंबात जाळायलाही ती लायकीची नाहीत. नुसता धूर होईल धूर, बुरसटलेल्या विचारांचा. साधी रद्दीत तरी घेतील की नाही या विचारानं माझा जीव वर-खाली होतोय.”

हा टोमणा ऐकून घेतात की काय छबुराव!

“हं.. म्हणजे चक्क हा माझा अपमान नसून त्या परमपूज्य, आदरणीय, मस्तकावरून मिरवावेत अशा ग्रंथराजांचा, त्यांच्या जन्मदात्यांचा अन् धर्माचा अपमान आहे. आणि काय गं, त्यांच्या जागी रसरंग अन् रहस्यकथांच्या पुस्तकांची चवड लावायचीय वाटतं” थोडं थांबून.. “अन् तेवढं सगळं सामान ठेवायचं कुठं पुन्हा?”

“गॅलरीत.” मिसेस छबुराव कुठल्याही प्रश्नावर जास्त खल करत बसत नाहीत.

“हं. म्हणजे लोकांना जाता-येता मोफत प्रदर्शन!”

अशा तऱ्हेच्या प्रेमळ संवादांना आवरता आवरताच दोघांच्या नाकांना मिळून नव्याण्णव येतात.

पण यावरून आवराआवरीची साधी-सोपी व्याख्या मात्र करता येते. ‘जुन्याचा सोस आवरायचा अन् नव्या हौसेचा त्या ठिकाणी पसारा करायचा.’ गोळाबेरीज एकच असली तरी नावीन्याचा

प्रादुर्भाव मनाला आनंद देऊन जातोच की, अन् नवऱ्याला बेकार राहू न देण्याचं परमकर्तव्य त्यात आलंच. आणि हो, साऱ्याच जुन्या वस्तू तरी कुठं टाकता येतात! छबुरावांच्या मनाला यातना होतात म्हणून दासबोध, ज्ञानेश्वरी, लौकिकात वापरले न गेलेले अलौकिक कवितासंग्रह, ‘एकता’चे (एकता कपूर नाही हो.. एकता मासिक) अनेक अंक हे गटागटाने विभक्त करून मांडले जातात. बाकीच्या रद्दीच्या पसाऱ्यात छबुरावांनी मेहनतीनं लिहिलेल्या कथांचा समावेश केला जातोच. साभार परत येण्यापेक्षा कायमच्या गेलेल्या बऱ्या, असं समाधान करून घेऊन ते बसतात. पुढे अस्ताव्यस्त पसरलेल्या कपडय़ांतून पटकूर म्हणून लायक असलेले कपडे, ठिगळे लावलेले कपडे, बऱ्यापकी धड कपडे यांचे निरनिराळे बस्ते बांधून ठेवले जातात. त्यातच नजरचुकीने धाकटय़ा कन्येची लाडकी बाहुली तिच्या नेसूसकट घुसडली जाते, तेव्हा भोवती संगीत हलकल्लोळ सुरू होतो. अन् त्यातून पटकुरांची संख्या वाढत जाते.

अशा साऱ्या सावळागोंधळातही छबुरावांचा पूर्वजांबद्दलचा आदर ओसंडून वाहत असतो. त्यांची प्रत्येक चीजवस्तू ते जपून हाताळण्याचा प्रयत्न करत असतात, अन् जेव्हा त्या अडगळीत एखादं मेलेलं झुरळ सापडतं तेव्हा भावनातिशयाने त्यांना ते पूर्वजांची आठवण म्हणून कपाटावर लावून ठेवण्याची नामी कल्पना सुचते. पण तेवढय़ात मिसेस छबुरावांच्या थयथयाटामुळे होणारा पसारा आवरण्याच्या भीतीमुळे तो बेत रद्द करून ते झुरळ पुन्हा अडगळीतच ठेवावं लागतं.

त्याच वेळी कपाटातल्या जुन्या भांडय़ांचा खणखणाट आणि जमिनीवर आपटण्याचा दणदणाट ऐकू येतो. अतिशय क्षुल्लक कारणावरूनही भांडय़ांवर राग काढण्याचा मिसेस छबुरावांचा सोज्वळपणा (जोपर्यंत आपल्या अंगावर काही शेकाटत नाही तोपर्यंत बायकोची प्रत्येक कृती सोज्वळ, अशी भावना छबुरावांची झालेली आहे) छबुरावांना माहीत आहे. कारण यापूर्वी एकदा आवराआवरीच्या निमित्तानेच असा एक समरप्रसंग येऊन गेला होता. आवराआवरीसाठी बंब तापलाय तोपर्यंत आंघोळ करून शुचिर्भूत व्हावं असं मिसेस छबुरावांचं म्हणणं आणि ‘आधी लगीन कोंढाण्याचं’ (इति ता. मा.) याप्रमाणे आधी आवराआवर अन् मगच आंघोळ, असा निश्चय छबुरावांचा. यांमुळे सध्या वापरात असलेली स्वयंपाकघरातली बरीचशी भांडी इतस्तत: विखुरली गेलेली होती अन् तो पसारा आवरण्यात मुख्य आवराआवरीचा भाग विरून गेलेला होता.

पण आजची गोष्ट वेगळी. कारण प्रत्येक भांडं बाहेर येण्याच्या स्थितीत असतानाच झुरळांच्या अनेक पिढय़ा उजाड होत असतात आणि त्या पिलावळीच्या वाढत्या रांगांबरोबरच मिसेस छबुरावांच्या हातून भांडय़ांना येणारे पोचे आपसुक वाढत असतात. त्यांचा अगदी नाइलाजच होतो. आपण निराधार झालो अशा तऱ्हेचा निषेध करणाऱ्या झुरळांचा मूकमोर्चा आहे, हे लक्षात येणं दुरापास्त असतं. आणि काही वेळाने कपडे, जळमटं, भांडी यांच्यात मिसेस छबुराव या 'घेरावा'त सापडलेल्या कुलगुरूंसारख्या दिसू लागतात. हा सारा चक्रव्यूह भेदून छबुरावांचे मधले चिरंजीव धावत धावत कपाटापाशी पोहोचतात अन् त्यांना आवरायला पुढे सरकलेल्या छबुरावांचा पाय मिसेसच्या हाताच्या तळव्यावर पडतो अन् त्यामुळे त्या "मेल्यांनो" असं मोठय़ाने ओरडून चिरंजीवांवर राग काढतात. हातात जळमटांनी माखलेला चेंडू गवसलेल्या चिरंजीवांची अवस्था जयद्रथाच्या हाती सापडलेल्या वीर अभिमन्यूसारखी होते, अन् मग सुरात सूर मिसळत जातात.

"ही माझी शाळेतली प्रगतिपुस्तकं सापडली बघ". बऱ्याच वेळाने छबुरावांच्या सुराला उजाळा मिळतो अन् मांजराने आपलीच पाठ चाटावी तसं ते हर्षाने उद्गारतात.

"काही सांगू नका, शुंभांनी तुमचाच कित्ता गिरवलाय अभ्यासात". अंगावर लाटणं आल्यासारखं वाटतं अन् पुस्तकांची मुकाटय़ानं उचकापाचकी सुरू होऊन हरिदासाची कथा मूळपदावर येऊन ठेपते. कुठल्या गोष्टी ठेवायच्या अन् कुठल्या वस्तूंना बाहेरची वाट दाखवायची, यावर वादविवाद स्पर्धेला ऊत येतो आणि आता कुठली बाजू हार खाते याकडे पोरं लक्ष ठेवून बसतात.

छबुरावांच्या मते- गंजलेलं जुनं ब्लेडही जपून ठेवायचं असतं, कारण ते त्यांच्या पणजोबांनी वापरलेलं असेल तर. त्यांचा चेहरा पाहिला नाही तर निदान त्यांच्या चेहऱ्यावरून फिरलेलं हे ब्लेड ठेवलंच पाहिजे, असा त्यांचा अट्टहास असतो. तसंच ज्या लोटय़ाने छबुरावांना जीवन म्हणजे पाणी दिलं, ज्या पितळेच्या थाळयातून त्यांनी लहानपणी चार-दोन घास खाल्ले, त्यांचा ऋणानुबंध कसा सुटावा!

"ही सारी भांडी पाहिली की आमच्या मातोश्रींच्या हातच्या लज्जतदार स्वैंपाकाची आठवण होते" छबुराव गहिवरून म्हणतात.

“म्हणूनच म्हणते, ती सगळी मी मोडीत घालून टाकणार आहे.” मिसेस छबुरावांचा स्वाभिमान नकळत दुखावला गेलेला असतो.

“बरं, ते राहू दे. आईची नऊवारी साडी, नानांची धोतरजोडी हे जिन्नस तरी राहिलेच पाहिजेत. बोहारणीच्या पायापाशी टाकून देण्यापेक्षा रात्रीचं पांघरुण होईल आपल्याला. त्यांच्या मायेचा उबारा आपल्याला त्यातूनही अनुभवायला मिळेल.” छबुरावांचा गळा आता दाटून आलेला असतो. “छान. त्यातून डास, ढेकूण यांची रहदारी सुरू झाली म्हणजे झोपणं मुश्कील होईल.” मिसेस छबुराव त्या पूज्य वस्त्रांची लक्तरंच काढतात.. “अन् काय हो, ती मोठमोठी पुस्तकं केव्हा वाचणार आहात तुम्ही? जुनी कुठली तरी भारुडभरती डोक्याशी घेऊन बसायची अन् आजकालचा पेपरसुद्धा वाचायला फुरसत नाही, अशा काळात मोठमोठय़ाने तत्त्वज्ञान घोकून आपल्या अज्ञानात भर घालून घ्यायची! सांगितली कुणी नस्ती उठाठेव!”

छबुरावांचा हा सरळसरळ उपमर्दच.

“मी सांगून ठेवतो, त्या पुस्तकांच्या पानांवर पाणी तापवणार असशील तर मी गार पाण्याने आंघोळ करीन अन् रद्दीत घातलीस तर छापील किमतीला परत आणीन.” छबुरावांचा अभिमान ऊतू चाललाय.. “सगळयाच जुन्या वस्तूंची विल्हेवाट लावून असा कोणता आनंद मिळवणार आहेस तू? आता तू जुनी झालीस म्हणून काय मी तुला अडगळ ठरवायची?” सुसंस्कृतपणाचं अगदी जवळचं उदाहरण देण्याच्या भरात छबुराव बोलून गेलेले असतात, पण.. “हं.. तुम्हाला तेच पाहिजे. कधी एकदा ससेमिरा सुटतो बायकोचा! उपाशी बसा कवटाळून ही सगळी दळभद्री लक्षणं. मी जाते माझ्या आईकडे आत्ताच्या आत्ता. मेलं. आप गेलं अन् जग बुडालं!” भांडी-कपडय़ांचा चक्रव्यूह इतस्तत: पुन्हा एकदा गडाबडा लोळतो. खोली दुमदुमून जाते. मातीच्या रस्त्यावरून बैलगाडी खडखडाट करत गेल्यावर धूळ उडावी तसं मिसेस छबुरावांच्या प्रस्थानाबरोबर तीनही पोरं इकडंतिकडं उधळतात.

अशा तऱ्हेने प्रेमळ संवादांच्या स्वागतगीताने सुरू झालेला हा सांस्कृतिक कार्यक्रम प्रचंड गदारोळात बरखास्त होतो; अन् तोपर्यंत त्या खोलीला गोडाऊनचं स्वरूप प्राप्त झालेलं असतं..आणि अशा वेळी पाहुणे म्हणून आपल्यासारखं कोणी तिथं गेलंच तर पसरलेल्या सामानातून यजमानांना हुडकून काढणं, हे आपलं प्रथमकर्तव्य असतं.

हं.. घरोघरी गॅसच्याच शेगडय़ा!

# ई साहित्य प्रतिष्ठान

*बारा लाख मराठी वाचकांसाठी ई चळवळ*

मराठीत तुकोबा ज्ञानेश्वरांसारखे महान संतकवी होऊन गेले. पुलं , जीएं सारखे महान लेखक गेल्या शतकात होऊन गेले. या सार्‍यांबद्दल बोलताना लोक न भूतो न भविष्यती असे म्हणतात. पण आम्हाला हे पटत नाही. ज्ञानोबा तुकारामासारखे संत सहस्त्रकांतून होतात हे खरे. पण मराठीतली प्रतिभा आता आटली हे मात्र खरे नाही. आमचा विश्वास आहे की मराठीत आताही कुठे कुठे महान प्रतिभा जन्माला येत असेल आणि लोकाश्रयाच्या अभावी कोमेजूनही जात असेल.

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत गाभवनाची कल्पना मांडली आहे. आपल्या घरातले वाल, वाटाणे, चवळी असतात ना! त्यांच्या आत एक छोट्टुशी पानांची जोडी असते. हे वाल, वाटाणे, चवळी जर मातीत रुजवली तर त्यातून मोड बाहेर पडतो आणि त्याचं मूळ होतं. आणि ही जी छोट्टुशी पानं असतात त्यांच्यातून बनतो वेल किंवा वृक्ष. आणि या वेलीला पुन्हा शेंगा येतात. आणि त्यातून पुन्हा हजारो दाणे. आणि त्यात पुन्हा गाभवनं. म्हणून ज्ञानोबा या एका एका दाण्यात एक एक वन उभं राहिल अशी क्षमता असते असं मानतात. पण हा दाणा आपण भाजीत घालून खाल्ला की मात्र संपून जातो.

अशीच असते मानवी प्रतिभाही. मराठी भाषेत किती तरी प्रतिभावान व्यक्ती साहित्याच्या बागा उभारू शकतील अशा क्षमतेच्या असतात. पण त्यांना योग्यवेळी माती पाणी मिळत नाही. आणि त्यांच्या या साहित्याचा आनंद लोकांपर्यंत कधीच पोहोचत नाही.

दुसरीकडे असे लाखो वाचक असतात. ज्यांना काही नवीन छान साहित्य वाचायची इच्छा असते. पण त्यांना पुस्तकं मिळत नाहीत. परवडत नाहीत. कोणती घ्यावीत आणि वाचावीत ते कळत नाही. अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठानने नवीन साहित्यिकांसाठी ई पुस्तकांचे व्यासपीठ उभे केले. आणि लाखो वाचकांपर्यंत ही पुस्तके विनामूल्य वितरीत करायला सुरूवात केली.

चार वर्षांपुर्वी स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना अडिचशेहून अधिक, दर्जेदार, मराठी ई पुस्तके विनामूल्य दिली आहेत. मोरया, मीरा, कृष्णा, गुरुदेव रविंद्रनाथ, स्वा. विवेकानंद, विंदा करंदिकर, ना धों महानोर, ग्रेस , नारायण सुर्वे, लोकमान्य टिळक, छत्रपती शिवाजी महाराज, शंभूराजे असे एकाहून एक सरस विषय आम्ही घेतले. सुमारे चारशे नवीन साहित्यिकांना या व्यासपीठावरून सादर केले. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. प्रेम आणि सौंदर्याबरोबरच विद्यार्थी आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या, दहशतवाद, स्त्रियांवरील अत्याचार अशा ज्वलंत विषयांवरचं साहित्य मांडलं. विनोदाला वाहिलेलं ई श्टाप देऊन हसवलं. लहान मुलांसाठी बालनेटाक्षरीची निर्मिती केली. शास्त्रीय संगीताची समज तरुणांत येण्यासाठी संगीत कानसेनचे ई वर्ग चालवले. नव्या कवींसाठी एक भक्कम व्यासपीठ म्हणजे नेटाक्षरी चालवले. तर महाराष्ट्रातल्या किल्ल्यांची माहिती देणाऱ्या पुस्तिकांची मालिका "दुर्ग दुर्गट भारी" द्वारे महाराष्ट्रातल्याच नव्हे तर जगभरातल्या मराठी मंडळींना मराठमोळ्या इतिहासाची उभारी दिली. "जिथे जिथे मराठी माणूस, तिथे तिथे ज्ञानेश्वरी" ही चळवळ आपण पहात आहातच. केवळ कविताच नव्हे तर कथा कादंबऱ्या, कॉमिक्स, गूढकथा आणि गंभीर विषयांवरची पुस्तकेही आपल्याला इथे मिळतील.

सव्वा लाखभर रसिकांपर्यंत दर्जेदार साहित्य नियमितपणे विनामूल्य पोचवण्याची आमची परंपरा आम्ही सातत्याने चालू ठेवूच. आम्हाला हा उत्साह आणि प्रेरणा देणारी आपली पत्रेही येत राहू द्या. पण मनात एक विचार येतो. आपली वाचकसंख्या फ़क्त लाखभर लोकांपर्यंत मर्यादित का? १२ कोटी मराठी माणसांपैकी निदान १२ लाख वाचकांपर्यंत तरी हे विनामूल्य ई साहित्य पोचलंच पाहिजे असं नाही का वाटत आपल्याला? आणि त्यासाठी काही फ़ार करायची गरज नाही बंधो. आपल्या ओळखीच्या बारा लोकांची, फ़क्त बारा मराठी लोकांची मेल आय डी द्याल? जास्त दिलीत तरी हरकत नाही. पण निदान १२ मित्र किंवा नातेवाईकांची मेल आय डी पाठवा. असे लोक ज्यांनी मराठी साहित्य वाचावे अशी आपली इच्छा आहे. मराठी माणूस एकवेळ पैशांनी गरीब असेल, पण मित्रांच्या बाबतीत श्रीमंत असतो. एक लाख लोकांनी जर प्रत्येकी बारा आय डी पाठवले तर लाखाचे बारा लाख व्हायला कितीसा वेळ लागणार?

बारा लोकांची मेल आयडी पाठवणाऱ्या वाचकांना आम्ही ई साहित्य पाठीराखे म्हणून वेगळे मानाचे स्थान देऊ. तुम्हाला आमच्या पुढील प्रवासाची कल्पना देत राहू. तुमच्या सूचना मागवू. तुमच्याकडून मार्गदर्शन घेत राहू. आमच्या पुढील प्रवासाचे तुम्ही सहप्रवासी असाल.

**तर होणार ना ई साहित्यचे पाठीराखे ?**

**आपल्या खास मराठी मित्र नातेवाईकांच्या बारा मेल आय डी esahity@gmail.com वर पाठवा.**

खात्री बाळगा, या मेल्सचा कोणत्याही तऱ्हेने गैरवापर केला जाणार नाही. त्यांना जाहिराती किंवा फ़ालतू मेल पाठवून त्रास देणार नाही. यांचा उपयोग केवळ चांगले दर्जेदार मराठी साहित्य पाठवण्यासाठी केला जाईल.

www.esahity.com

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**